CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

सोमवार, दि. २९ ऑगस्ट २०२२ ▶ वर्ष : २० वे ▶ अंक : ३३० वा किंमत : ५ रुपये ▶ पाने ८

## ठाण्यात १६ वर्षीय मुलीवर सामूहिक बलात्कार

**सुराज्य/ठाणे** : महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यात १६ वर्षीय मुलीवर सामूहिक बलात्कार केल्याप्रकरणी तिघांना अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी रविवारी ही माहिती दिली. २६ ऑगस्ट रोजी घडलेल्या या घटनेतील एक आरोपी मर्चंट नेव्हीचा कर्मचारी आहे, तर दुसरा हिस्ट्रीशीटर असल्याचे सांगितले.

ठाणे गुन्हे शाखेच्या (युनिट ५) अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी दुपारी तीन आरोपींनी मुलीला भिवंडीतील काल्हेर येथील फ्लॅटमध्ये नेले. सचिन कांबळे (३०), आकाश कनोजिया (२२) आणि आसू (२०) अशी आरोपींची नावे आहेत. पोलिसांनी सांगितले की, पीडितेने ठाणे शहरातील वागळे इस्टेट विभागातील चितळसर पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारींच्या आधारे आरोपींना अटक करण्यात आली आहे.

## काँग्रेसच्या नव्या अध्यक्षांची निवड १९ ऑक्टोबरला

**सुराज्य/नवी दिल्ली** : बड्या नेत्यांच्या राजीनाम्यामुळे एका पाठोपाठ एक धक्के खाणाऱ्या काँग्रेसच्या अध्यक्षाची निवड आता १९ ऑक्टोबर होणार आहे. काँग्रेस अध्यक्षपद निवडणुकीच्या कार्यक्रमाबाबत चर्चा करण्यासाठी रविवारी दुपारी काँग्रेस कार्यकारिणीची व्हर्च्युअल बैठक झाली. या बैठकीत निवडणुकीचा कार्यक्रम निश्चित करण्यात आला.

काँग्रेस पक्षाला मागील दोन वर्षांपासून झटक्यांवर झटके बसत आहेत. काँग्रेस नेते राहुल गांधी यांचे निकटवर्तीय जितिन प्रसाद यांनी भाजपमध्ये प्रवेश केला होता. त्यानंतर कपिल सिब्बल, ज्योतिरादित्य सिंधिया आणि गुलाम नबी आझाद यांनी राजीनामा दिला. तर आता तेलंगणमधील काँग्रेसचे नेते आणि माजी राज्यसभा सदस्य एम ए खान यांनी राजीनामा दिला आहे.

# ‘आदिनाथ’चं चांगभलं ऽऽऽ

**सुराज्य/सोलापूर**

**आदिनाथ सहकारी साखर कारखाना. करमाळा तालुक्यातील पहिला कारखाना. काही वर्षे चांगला चालला. नंतर लागली घरघर. त्यामुळे झाला बंद. त्याचदरम्यान राज्यात महाविकास आघाडीची सत्ता आली. सत्तेत भागीदार असणाऱ्या राष्ट्रवादीचे आ. रोहित पवार यांची नजर या कारखान्यावर पडली. त्यांनी भाडेतत्त्वावर घेण्याचे ठरवले. बोलाचाली झाल्या. वाटाघाटीही झाल्या. पण कारखाना काही सुरू झाला नाही. आता राज्यातली सत्ता गेली. ‘ई-डी’चे सरकार आले. करमाळ्यातीलच कारखानदार असणारे तानाजी सावंत मंत्री झाले. त्यांनी हा कारखाना सुरू करण्याचा निर्णय घेतला. तात्काळ नऊ कोटी रुपये भरले. हा सहकारी साखर कारखाना ‘सहकारी’च ठेवण्याचा निर्णय घेत रविवारी ‘आदिनाथा’ची पूजा बांधली. ‘आदिनाथ’चं चांगभलंऽऽऽ म्हणत दुरुस्तीच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला.**

या कारखान्याला आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी आदिनाथ भाडेतत्त्वावर देण्याचा निर्णय घेतला. रोहित पवार यांचे नियंत्रण असलेल्या बारामती ॲग्रोने कारखाना भाडेतत्त्वावर घेण्यासाठी निविदा भरली. सर्वात जास्त रकमेची निविदा आल्यामुळे शिखर बँकेकडून हा कारखाना ‘बारामती ॲग्रो’ला भाडेतत्त्वावर देण्याचा निर्णय घेण्यात आला. दरम्यान राज्यात सत्तांतर झाले आणि सोलापूर जिल्ह्यात सहकार क्षेत्रात पाय रोवलेले राज्याचे आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी हा कारखाना सहकारी तत्त्वावरच सुरू व्हायला हवा,असा आग्रह धरून त्यांनी स्वतः तब्बल ९ कोटी भरले. सावंत यांनी हे पैसे भरल्यानेच कारखाना सहकारी तत्त्वावर सुरू करण्याची संधी तालुक्याला मिळाली आहे.

## भोंगा वाजणार, गाळप होणार



### ५ लाख मे.टन गाळपाचे उद्दिष्ट

मंत्री तानाजी सावंत यांनी कारखान्यासाठी नऊ कोटी रुपये भरले. त्यामुळेच आज आदिनाथ कारखाना आपण सुरू करत आहोत. चालू हंगामात पाच लाख मे. टन ऊस गाळप करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. कारखान्यांबाबत बागल व आम्ही एकत्र काम करण्याची सूचना सावंत यांनी आम्हाला केली आहे, त्याप्रमाणे भविष्यात कारखान्याचे कामकाज केले जाणार आहे, असे मनोगत माजी. आ. नारायण पाटील यांनी आदिनाथाच्या अभिषेकानंतर व्यक्त केले.

### सहकारी कारखाना ‘सहकारी’च राहणार

आदिनाथ कारखाना सहकारीच राहिला पाहिजे, यासाठी माजी आ.नारायण पाटील यांनी उघड भूमिका घेतली. राज्यात सत्तापरिवर्तन होताच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांच्याकडे पाठपुरावा सुरू केला. पाटील यांच्या मागणीला सत्ताधारी मंडळींनी सकारात्मक प्रतिसाद दिल्यानेच आदिनाथ ‘सहकारी’ राहण्यास मदत झाली.

### शिखर बँकेने दिली ओटीएस योजना

आदिनाथ कारखाना आ. रोहित पवार यांच्या बारामती ॲग्रोला भाडेतत्त्वावर देण्याचा निर्णय झालेला असतानाही त्यांनी वेळकाढूपणा केला. परिणामी बारामती ॲग्रोला कारखाना देण्यास सत्ताधाऱ्यांचाच विरोध सुरू झाला. त्यात राज्यातील सत्तापरिवर्तन त्यांच्या पथ्यावर पडले. शिखर बँकेने ओटीस योजना दिली. त्यासाठीचे ९ कोटी रुपये मंत्री तानाजी सावंत यांनी भरले. त्यामुळे कारखाना ‘सहकारी’च राहिला आणि सुरू होण्याचा मार्गही मोकळा झाला.

### वाद चिघळण्याची शक्यता

हा कारखाना बारामती ॲग्रोलाच मिळाला पाहिजे, यासाठी न्यायालयाचे दार ठोठावले आहे. याबाबत २६ ऑगस्टला सुनावणी झाली. आता १९ सप्टेंबर ही पुढची तारीख देण्यात आली आहे. त्यातच राज्य शिखर बँकेच्या ओटीएस योजनेत सहभागी होऊन कारखाना स्वत:च चालवण्याचा निर्णय सत्ताधाऱ्यांनी घेतला आहे. बारामती ॲग्रोला दिलेली निविदा आणि आता कारखाना दुरुस्तीचे हाती घेतलेले काम ही सारी पार्श्वभूमी पाहता वाद आणखीन चिघळण्याची शक्यता आहे.

## फोटो व्हायरल करण्याची धमकी देऊन उकळली खंडणी

**सुराज्य/सोलापूर** : एका अल्पवयीन मुलीला तोंडावर ॲसिड टाकण्याची धमकी देऊन तिच्यासोबत प्रेमाचे नाटक रचून तिचे फोटो व्हायरल करण्याची धमकी देत तिच्याकडून पैसे उकळल्याची घटना नुकतीच उघडकीस आली. या प्रकरणात सलगर वस्तीच्या पोलिसांनी दोघा तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करून एकाला अटक केली.

पवन दिगंबर खंदारे (रा.संजय गांधी नगर सोलापूर) आणि गणेश काकडे (रा. खवणी ता. मोहोळ) अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत त्यापैकी पवन खंदारे याला पोलिसांनी अटक केली. ती अल्पवयीन मुलगी सोलापुरात राहण्यात आहे. गेल्या वर्षी पवन खंदारे हा तुझ्या संगे बोलायचे आहे असे म्हणत तिचा पाठलाग करून तिला गाठले. आणि तिला माझ्यासोबत गाडीवर बस म्हणून बळजबरी केली. तिने नकार दिली असता तिच्या तोंडावर ॲसिड टाकण्याची धमकी त्याने दिली. त्यानंतर तिला एका ठिकाणी नेले. तेथे त्याचा मित्र गणेश काकडे (रा.खवणी) याने मी तुझ्यासोबत प्रेम करतो. असे सांगून तिच्यासोबत फोटो काढून घेतले. आणि त्यानंतर तुझे फोटो व्हायरल करतो असे म्हणत दोघांनी तिच्याकडून पैसे उकळले. आणि तिच्या वडिलांना फोन करून धमकी दिली. अशी नोंद सलगरवस्ती पोलिसात झाली.

## रेल्वेवर चढून सेल्फी घेताना शॉक बसून तरुण जखमी



**सुराज्य/सोलापूर** : रेल्वे स्थानकात थांबलेल्या मालगाडीवर चढून सेल्फी घेत असताना विद्युत तारेचा शॉक बसल्याने १७ वर्षाचा तरुण भाजून जखमी झाला. ही दुर्घटना बंद असलेल्या कॅबिन जवळ रविवारी सायंकाळच्या सुमारास घडली.

मुकसित मुजाहिद जमादार (वय १७ रा. सिद्धेश्वरपेठ सोलापूर) असे भाजलेल्या तरुणाचे नाव आहे. त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. तो रेल्वे स्थानकातील बाळेच्या दिशेकडील कॅबिन जवळ एका थांबलेल्या मालगाडीवर चढून मोबाईल ने सेल्फी घेत होता. त्यावेळी विद्युत तारेच्या स्पर्श झाल्याने तो खाली कोसळून भाजला. त्याला गंभीर अवस्थेत रेल्वे पोलीस आणि मतीन बांगी यांनी शासकिय रुग्णालयात दाखल केले . जखमी जमादार हा अकरावी इयत्तेत शिकत असल्याची प्राथमिक माहिती मिळाली. या घटनेची नोंद रेल्वे पोलिसात झाली आहे.


## अल्पवयीन तरुणीला पळवून नेऊन बलात्कार

**सुराज्य/सोलापूर** : एका अल्पवयीन तरुणीला भेटण्यास बोलावून तिला दुचाकी वरून पळवून नेऊन तिच्यावर बळजबरीने बलात्कार केल्याची घटना १९ ऑगस्ट रोजी होम मैदान ते काटगाव (ता. तुळजापूर) यादरम्यान घडली. या प्रकरणात सदर बजारच्या पोलिसांनी मारुती वाघमारे (वय २१ रा.काटगाव ता. तुळजापूर) याच्याविरुद्ध बलात्कार आणि पोक्सोचा गुन्हा दाखल केला.

**तुळजापूर तालुक्यातील तरुणाविरुद्ध गुन्हा**

ती अल्पवयीन तरुणी सोलापुरात कॉलेजमध्ये शिकण्यास आहे. १९ ऑगस्ट रोजी सकाळच्या सुमारास मारुती वाघमारे यांनी तिला फोन करून होम मैदान येथे भेटण्यासाठी बोलावले. त्यानंतर तिला आपण तुळजापूर येथे दर्शनासाठी जाऊ म्हणून दुचाकी वरून तुळजापूरला नेले. त्यानंतर मारुतीने तिला आपल्या काटगाव येथील घरी नेले. आणि तिच्यावर अत्याचार केला. अशा आशयाची फिर्याद त्या तरुणीने नुकतीच सदर बाजार पोलिसात दाखल केली. पुढील तपास सहाय्यक फौजदार कांबळे हे करीत आहेत.


## भारताने विजयासह त्याच मैदानात घेतला पराभवाचा बदला



**दुबई** : भारताने १० महिन्यानंतर झालेल्या त्याच मैदानातील सामन्यात पराभवाचा बदला घेतला. पाकिस्तानने भारतापुढे विजयासाठी १४८ धावांचे आव्हान ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना विराट कोहली आणि रोहित शर्मा मोक्याच्या क्षणी बाद झाले. पण त्यानंतर रवींद्र जडेजा आणि हार्दिक पंड्या यांनी दमदार फलंदाजी करत भारताला विजय मिळवून दिला. जडेजाने यावेळी ३५ धावांची दमदार खेळी साकारली, तर हार्दिकने (नाबाद ३३) अखेरच्या षटकार लगावत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

पाकिस्तानच्या १४८ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना भारताची चांगली सुरुवात झाली नाही. कारण डावाच्या दुसऱ्याच चेंडूवर भारताचा सलमावीर लोकेश राहुल बाद झाला आणि भारताला पहिला धक्का बसला. त्यानंतर रोहित शर्मा आणि विराट कोहली ही अनुभवी जोडी खेळपट्टीवर होती. पण रोहितला या सामन्यात लय सापडल्याचे पाहायला मिळाले नाही. कारण रोहित धावा जमवण्यासाठी झगडत होता. पण त्याचवेळी विराट आक्रमक खेळ करत होता. पण थोड्यावेळात स्थिरस्थावर झाल्यावर रोहितने मोठे फटके खेळायला सुरुवात केली. पण रोहितची ही फटकेबाजी अल्पायुषी ठरली. रोहितला यावेळी १८ चेंडूत १२ धावा केल्या. रोहित बाद झाल्यावर कोहलीवरसंघाची जबाबदारी होती. पण काही चेंडूमध्येच कोहलीनेही आपली विकेट आंदण दिली आणि त्यामुळे भारत अडचणीत सापडला. कोहलीने यावेळी ३४ चेंडूत ३५ धावा केल्या.

## पोलीस निरीक्षकांनी केला पोलीस नाईकावर गुन्हा दाखल




**सुराज्य/सोलापूर**

दोन वर्षांपासून वेळोवेळी सूचना करूनही विविध गुन्ह्यांमध्ये न्यायालयात दोषारोपत्र सादर न केल्याप्रकरणी पोलीस नाईक विरुद्ध पोलीस निरीक्षकाने गुन्हा दाखल केला आहे.

विकास दगडू देशमुख,पोलीस निरीक्षक (गुन्हे) फौजदार चावडी पोलीस ठाणे यांनी दिलेल्या फिर्यादीत पोलीस नाईक सिध्दाराम धरेप्पा बरगुडे,सध्या नेम सलगर वस्ती पोलीस ठाणे,सोलापूर शहर यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.सन २०१९ पासून ते सन २०२१ पर्यंत फौजदार चावडी पोलीस ठाण्यात पोलीस नाईक बरगुडे यांनी प्रलंचित गुन्ह्यामध्ये न्यायालयात दोषारोपत्र सादर करण्याचा कालावधी होऊन गेलेला आहे.विद्यमान वरिष्ठ पोलीस निरीक्षक तसेच तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक,पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांनी पो.ना. बरगुडे यांना गुन्हे निर्गती करिता वेळोवेळी आदेश दिलेले आहेत. तरी देखील त्यांनी आदेशाकडे दुर्लक्ष करुन गुन्हे निर्गती केलेली नाही.त्यामुळे कामात हलगर्जीपणा केल्याबद्दल फिर्यादी देशमुख यांनी बरगुडे विरुद्ध सरकार तर्फे तक्रार आहे.असे फिर्यादीत नमूद आहे या घटनेचा पुढील तपास स.पो.नि. गायकवाड हे करीत आहेत.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



फसू नकोस, कारंजे दाखवून वेड्यात काढतोय तो !!

## उच्चभ्रू जुळे सोलापुरात रेशन कार्डवरील साडेसहाशे क्विंटल धान्य होते फस्त

**सुराज्य / दीपक शेळके**

गरीब परिवारास आधार मिळावा म्हणून रेशन कार्डवर कमी दरात धान्य देण्याच्या शासनाच्या योजनेचा लाभ गरजूंपेक्षा हौशीकडून अधिक घेत असल्याचे निदर्शनास येत आहे. सोलापुरातील उच्चभ्रू समजल्या जाणाऱ्या जुळे सोलापुरात रेशन कार्डवरील साडेसहाशे क्विंटल धान्य एका महिन्यात फस्त केले जात असल्याची माहिती उजेडात आली आहे.

गोरगरिबांना दोन वेळचे अन्न मिळावे या साठी शासन व ग्राहक दुवा म्हणून रेशन दुकानांची निर्मिती करण्यात आली. या रेशन दुकानाच्या माध्यमातून आणि बाणीचा काळ असो की बिकट दुष्काळ सध्यस्थितीत किंवा कोरोना सारख्या महामारीत देखील अनेक गोरगरिबांना



खूप मोठा आधार रेशन प्रणालींच्या माध्यमांतून वाटण्यात आलेल्या धान्याचा झाला. गोरगरीब कार्डधारकांना अत्यंत अल्प दरात धान्य मिळावे ह्याकरता अन्नसुरक्षा अधिनियम २०१३ पासून गहू २ रुपये तर तांदूळ ३ रुपये किलो माणसी ५ किलो धान्य देण्याची योजना आहे. उच्चभ्रू भागातील धनिक डल्ला मारत असल्याचे निदर्शनास आले आहे. या प्रकाराकडे परिमंडळ अधिकाऱ्यांनी कानाडोळा केल्याने सध्याचे चित्र आहे. जुळे सोलापूर भाग हा उच्चभ्रू वसाहत म्हणून ओळखले जातो, ह्या भागातील नागरिक जवळपास ९९ टक्के सधन आहेत. स्व मालकीचे घरे, इमारत, रो हाउस, बंगले आहेत. यांच्या घरासमोर चार चाकी गाडी दिमाखात उभी असते हे सधन लोक धान्याचा लाभ घेत आहेत. या भागात जवळपास १२ रेशन दुकाने आहेत. ३०४९ शिधापत्रिका धारक आहेत. लाभ घेणाऱ्या परिवाराची लोकसंख्या १२ हजार ७५५ असून आहे वर्षानुवर्ष ३८२.६५ क्विंटल गहू आणि २२५. १० क्विंटल तांदूळ एका महिन्यात फस्त केले जाते एकीकडे धान्य सोडा योजनेचा सोलापुरातील योजनेचा शासन पातळीवर मोठा गाजावाजा झाला आहे.मात्र या भागातील धान्यावर डल्ला मारण्याच्या प्रकाराला आळा का घातला जात नाही या भागाची क परिमंडळ विभागाचे अधिकारी का लक्ष देत नाहीत असा प्रश्न निर्माण झाला आहे. शासनाच्या धान्य सोडा योजनेला हे अधिकारी काळिमा फासण्याचे काम करत नाहीना असा प्रश्न देखील निर्माण झाला आहे.

### उपायुक्तांनी लक्ष द्यावे

पुरवठा विभागाचे उपायुक्त डॉ.त्रिगुण कुलकर्णी हे रेशन दुकाने आएसओ करण्यापासून धान्य सोडा योजनेसाठी पाठपुरावा करत आहेत. जिल्हापुरवठा अधिकारी शहर धान्यवितरण अधिकारी धान्य सोडा योजनेसाठी धडपड असताना या भागातील डल्ला मारला जाणाऱ्या धान्य बंद झाल्यास हे धान्य गरजू लोकांच्या मुखात जाईल. त्याशिवाय हे धान्य बंद झाल्यास कोट्यवधी निधींची बचत होणार आहे. या प्रकाराकडे उपायुक्तांनी लक्ष घालण्याची गरज आहे.

### संयुक्त मोहीम घेण्याची गरज

जुळे सोलापुरातील कल्याण नगर, रुबी नगर, पारधी वस्ती हा भाग झोपडपट्टी भाग आहे. या भागात खरे लाभार्थी आहेत. हा भाग वगळता इतर भागात शोध मोहीम घेऊन धान्य सोडा. या योजना प्रभावीपणे राबवली गेली पाहिजे. यासाठी शहर पुरवठा विभाग आणि जिल्हापुरवठा विभागाने संयुक्त मोहीम घ्यावी, अशी मागणी होत आहे.

CMYK

# शेती क्षेत्राची दैना...

पंजाब हे कृषिप्रधान राज्य म्हणून उभ्या भारतात या राज्याची ओळख आहे. शेती करावी तर पंजाबच्याच शेतकऱ्यांनी करावी, असेही म्हटले जाते. निष्ठावंत शेतकरी तिथे पहायला मिळतात. संबंध देशाला पुरेल इतका गहू तिथे पिकला जातो. केवळ घरगुतीच नव्हेतर बेकरी व्यवसायाला गव्हाचा पुरवठा करण्याची ताकत तिथल्या शेतकऱ्यांमध्ये आहे.तिथे शेतमालकच स्वतः राबत असतो.ट्रॅक्टरवर बसून स्वतः शेताची नांगरणी व पेरणी करत असतो. इतकी माया त्या शेतकऱ्यांची शेतीशी असते. अशा कृषिप्रधान राज्यातच शेती क्षेत्राची दैना झाल्याचे चित्र समोर आले आहे. पंजाबमधून मोठा कृषी घोटाळा उघडकीस आला आहे. सरकारने पंजाबमधील शेतकऱ्यांना ९० हजार पीक अवशेष काढणी यंत्रांचे वाटप केले होते. मात्र तपासणीदरम्यान केवळ ७९ हजार २९५ यंत्रांचीच नोंद केली गेलीय. पंजाबमधून ट्रॅक्टर, रोटाव्हेटर्ससह ११ हजारांहून अधिक यंत्रे गायब झाल्याचे सांगण्यात येते. या प्रकरणाची दखल घेत भगवंत सिंह मान सरकारने चौकशी समितीची स्थापना केली आहे. मागील काँग्रेस सरकारच्या



काळात हा कृषी घोटाळा झाल्याचा आरोप करण्यात येत आहे. जवळजवळ १५० कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याचे सांगण्यात येते. २०२१-२२ मध्ये कृषी आणि शेतकरी कल्याण विभागाकडून कृषी यांत्रिकीकरणाला चालना देण्यासाठी, पीक व्यवस्थापन योजनेअंतर्गत कृषी यंत्रांवर अनुदान दिले जात आहे. यामध्ये नोंदणीकृत शेतकरी गट, शेतकरी उत्पादक संस्था यांना कस्टम हायरिंग सेंटर उभारण्यासाठी ८० टक्के आणि वैयक्तिक श्रेणीमध्ये जास्तीत जास्त ५० टक्के अनुदान देण्यात येत आहे. अनुदान मिळाल्यानंतर, पंजाब कृषी विभाग अनुदानित यंत्र खरेदी करण्यासाठी दरवर्षी जाहिरातींद्वारे अर्ज मागवतात. यासाठी राज्य आणि जिल्हा अशा दोन समित्या स्थापन केल्या आहेत. कृषी अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यस्तरीय समिती वेगवेगळया जिल्ह्यांमध्ये भातशेतीखाली असलेल्या एकूण क्षेत्रावरून त्या जिल्ह्यात यंत्रवाटप करण्याचा निर्णय घेते. जिल्हास्तरीय समिती पडताळणीनंतर अंतिम लाभार्थ्यांची निवड करते आणि त्यांना दिलेल्या यंत्रांची तपासणी देखील करते. कृषी विभागाच्या म्हणण्यानुसार जेव्हा एखादे यंत्र अनुदानावर दिले जाते, त्याच वर्षी त्या यंत्राची तपासणी होते. तपासणीनंतर याची नोंद सरकारी कागदपत्रांमध्ये केली जाते. सीआरएम योजनेतील अनियमिततेच्या आरोपांनंतर आप सरकारने २०१८ पासून वितरित केलेल्या सर्व यंत्रांची तपासणी सुरू केली. तपासणीदरम्यान भटिंडा, फरीदकोट, फाजिल्का, मानसा, मुक्तसर साहेब इत्यादी जिल्ह्यांमधून १५ ते २० टक्के यंत्रे गायब असल्याचे समोर आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार अनेक शेतकऱ्यांनी सरकारकडून मिळालेली ही यंत्रे विकली आणि त्या पैशातून नवीन तंत्रज्ञान असलेली यंत्रे विकत घेतली. कारण सरकारने दिलेली यंत्रे ही जुन्या तंत्रज्ञानाची होती, असे शेतकऱ्यांचे म्हणणे पडले तर काही शेतकऱ्यांना मिळालेली यंत्रे त्यांच्या नातेवाईकांच्या घरी किंवा इतर गावांमध्ये पडून आहेत. सीआरएम योजनेअंतर्गत मिळालेली यंत्रे ५ वर्षांपर्यंत विकण्याची शेतकऱ्यांना परवानगी नाही. मात्र, काही शेतकऱ्यांनी ही यंत्रे एका वर्षाच्या आतच विकली असल्याचे समोर आले आहे. काही शेतकऱ्यांनी तर कस्टम हायरिंग सेंटर्ससोबत भाड्याने यंत्रे उपलब्ध करून देण्याचा करारही केला आहे. या घोटाळयामध्ये काही शेतकरी आणि अधिकाऱ्यांचाही समावेश असल्याचे सांगण्यात येते. वैयक्तिक शेतकरी किंवा शेतकरी गट ५० ते ८० टक्के अनुदानाने यंत्र खरेदी करतात आणि वर्षभरानंतर ती यंत्रे विकतात. यंत्रखरेदीनंतर शेतकऱ्यांना मिळणारी अनुदानाची रक्कम अधिकारी आणि शेतकऱ्यांमध्ये वाटून घेतली जात असल्याचा देखील दावा केला जात आहे. आधुनिक यंत्रे खरेदी करण्यासाठी शेतकरी ही यंत्रे विकत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे जुनी यंत्रे विकून नवीन आधुनिक यंत्रे देण्याची मागणी शेतकरी करत आहेत. शेतकरीच असे धंदे करत असतील तर ही शेतीशी प्रतारणाच ठरते. भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचे मोठे योगदान आहे. त्याला बळकटी देण्यासाठी केंद्र सरकारने कमी व्याजदरात पिककर्जही देते. त्याचा विनियोग शेतीसाठीच झाला पाहिजे. शेती यंत्रे वा अनुदान हे जनतेच्या कर रूपातून येणाऱ्या पैशातून दिले जाते. तेव्हा त्याच्याशी प्रामाणिक असले पाहिजे. शेतकरीच हे उद्योग करत असतील तर शेतच कुंपण खाऊ लागल्याचा हा प्रकार ठरतो. शेतकऱ्यांनी आपली निष्ठा व प्रामाणिकपणा ढळू देता कामा नये.

## सामाजिक

# तारीख पे तारीख...थांबणार कधी ?

**आठवड्यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांनी एका कार्यक्रमांमध्ये न्यायालयात जाऊन न्याय मिळतोच असे नाही, तर सामाजिक प्रक्रियेतून प्रश्न सुटू शकतात, मध्यस्थ म्हणून कायदा जाणणाऱ्या लोकांबरोबर सामाजिक कार्यकर्ते आणि सुबुद्ध नागरिकांनी पुढाकार घेण्याची गरज असल्याचे मत मांडले. याअगोदर अयोध्या, राफेल खटला या प्रसिद्ध खटल्यांचे अंतिम निकाल देणारे सुप्रीम कोर्टाचे तत्कालीन न्यायाधीश रंजन गोगोई यांनी न्यायव्यवस्थेबद्दल असेच खळबळजनक वक्तव्य केले होते की, कोर्टाकडे जाते कोण? न्यायालयात जाऊन पश्चाताप करून घेण्यासारखे आहे.**

खरंतर दोन्ही उदाहरणे जर बघितली तर सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींनी भारतीय न्यायव्यवस्थेसमोर आव्हान म्हणून उभ्या राहिलेल्या व अडचणीत आणणाऱ्या खटल्याच्या वाढत्या संख्यांबाबत व त्यामुळे होणाऱ्या न्यायाच्या विलंबाच्या बाबतीत भावना व्यक्त केली. त्यामुळे न्यायव्यवस्थेतील भारामुळे लोकांना लवकर न्याय मिळत नाही, हेच वास्तव पुढे आले. केंद्रीय कायदामंत्री किरेन रीजिजू यांनी राज्यसभेत २ ऑगस्ट २०२२पर्यंत सर्वोच्च न्यायालयात ७१४११ प्रकरणे प्रलंबित असल्याचे सांगितले, त्यापैकी १०४९१ प्रकरणे एक दशकाहून अधिक काळापासून प्रलंबित आहेत. सर्व उच्च न्यायालयात २९ जुलैपर्यंत ५९५५९०७ तर खालच्या कोर्टात ४.१३ कोटी इतकी प्रकरणे प्रलंबित असून न्यायाच्या प्रतीक्षेत आहे.

एकट्या महाराष्ट्रात १५,४८,५२२ दिवाणी, ३४६१२७२ फौजदारी प्रकरणे न्यायाच्या प्रतीक्षेत आहे. न्यायमूर्ती साहेबांनी एकंदरीत न्याय मिळवण्यासाठी लागणाऱ्या कालावधी, त्यामुळे न्यायावर होणारा परिणाम यासाठी न्यायव्यवस्थेत लोकांना झटपट न्याय मिळवून देण्याबाबत फेरबदल करणे, पर्यायी व्यवस्थेचा वापर करणे गरजेचे असल्याचे अप्रत्यक्ष विधान केले आहे.

निकाल देण्यास उशीर होणे हे भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २१ अंतर्गत जीवन जगण्याचे अधिकाराचे उल्लंघन आहे. कायद्यातील तत्त्व जस्टीस डीले, जस्टीस डीनाईड म्हणजेच उशिरा झालेला न्याय नाकारल्यासारखा आहे, असे म्हणतात. त्यामुळे न्याय मिळवण्याचा प्रक्रियेतील विलंब (उशीर) बाजूला सारून लवकरात लवकर केस मिटणे गरजेचे आहे, न्याय मिळण्यास होणाऱ्या उशिरास खटले न्यायव्यवस्थेची आर्थिक निधी अभावी झालेली अवस्था, न्यायाधीशाची व तज्ज्ञ कर्मचाऱ्याची कमतरता, रखडलेल्या न्यायाधीश आणि कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या, अपुऱ्या इन्फ्रास्ट्रक्चरच्या सोयी व इतर पायाभूत सोयीची जसे कोर्ट हॉल, न्यायाधीशांना रहिवासासाठी अपुरी निवासस्थान त्यामुळे झालेला त्याच्या कार्यक्षमतेवर झालेला परिणाम आणि कोरोना काळात वाढलेल्या लाखो खटल्याची संख्या ह्यावर त्यांनी केलेले जळजळीत भाष्य आहे. इतकी वर्षं या व्यवस्थेमध्ये काम केल्यानंतर आलेले अनुभव त्यातून कटू सत्य मांडण्याचा प्रयत्न केलेला असावा. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश राहिलेल्या न्यायमूर्तींनी अशी विधाने करून न्यायव्यवस्थेबाबत सामन्याचे मनात शंका निर्माण होत असली तरी ते वास्तव आहे.

जगातील दुसऱ्या क्रमांकाची लोकसंख्या आणि तिला न्याय मिळवून देणारा न्यायव्यवस्थेचा खांब आजही मजबूत आहे. नाहीतर तसे असते तर सामाजिक अराजकता निर्माण झाली असती. प्रश्न इतकाच होता न्याय सामान्यांना जलद पाहिजे तो व्यवस्थेमुळे उशिरा मिळतो. वर्षानुवर्षे कोर्टवारी करून तारीखच मिळणार असेल, तर न्याय मिळणार कधी? न्यायास होणारा विलंब हा तर खरा कळीचा मुद्दा आहे. त्यास अनेक कारणे आहेत, प्रमुख कारण हे राजकीय लोकांची न्यायव्यवस्थेकडे बघण्याची अनास्था हेच आहे. त्यामुळे पुरेसा आर्थिक निधी न्यायालयीन व्यवस्थेला मिळत नाही. याच कारणामुळे न्यायास उशीर होतो हे खरे वास्तव आहे.

उशिरा न्यायामुळे न्याय मागणाऱ्याला शारीरिक, मानसिक, आर्थिक त्रासाला सामोरे जावे लागते. त्यामुळे वेळेत निकालाचे फळ खायला न मिळाल्यास न्यायला अर्थ उरत नाही. खरं काही लोक म्हणतात, निकाल मिळाला, पण न्याय मिळाला नाही. निकालपत्र आणि न्याय दोन वेगळ्या बाबी आहे, कायद्याचा अर्थ लावणारे वकील पक्षकारांना ही गोष्ट कधीच समजावून सांगत नाहीत. खरं



तर निकाल होऊन त्याची अंमलबजावणी झाली तरच न्याय मिळाला असे म्हणता येईल. तरच त्या न्यायाला अर्थ आहे, नाहीतर न्याय मागणाऱ्याला तो साध्या कागदापलीकडे वेगळा वाटणार नाही. उदाहरणार्थ, कोर्टाने निराधार महिलेला खावटी मंजूर करण्याचा निकाल दिला, पण नवरा फरार झाल्यामुळे अनेक वर्षे वसुली करता येत नाही, म्हणजेच निकाल होऊन न्याय मिळाला असे होत नाही. त्यामुळे नुसते निकालपत्र मिळून फायदा नाही. लोकांना न्याय मिळणे अपेक्षित आहे.

न्यायालयीन कामकाजातील उणिवांबद्दल कुणीही राजकारणी, विचारवंत, अगर कायदेतज्ज्ञ अवमान कार्यवाहीला सामोरे जावे लागेल ह्या हेतूने विचार मांडताना दिसत नाहीत, परंतु सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती चंद्रचूड यांनी भारतीय न्यायव्यवस्थेची निःसंकोचपणे अंधारी बाजू स्पष्ट करून त्यावर जलद न्यायासाठी उपाय योजना करण्यासाठी प्रकाशझोत टाकलेला दिसतो. विधानाची सरकारने दखल घेऊन न्यायासाठी झगडणाऱ्या पक्षकारांना झटपट न्याय मिळू दिला पाहिजे हासुद्धा उद्देश त्या पाठीमागे असेल. दिवसेंदिवस केसची संख्या वाढतच चालली आहे, त्यामुळे न्यायव्यवस्थेवरचा ताण वाढतच चालला आहे. न्यायालये चालण्यासाठी न्यायाधीशाची, वकिलाची, इमारतीची मोठी संख्या, इतर पूरक सरकारी व्यवस्था व सुखसुविधांची गरज आहे. त्यासाठी आर्थिक निधीची गरज आहे. या गोष्टींकडे सरकारने लक्ष देऊन न्याय व्यवस्था आणि पक्षकारांना न्याय देणे गरजेचे आहे.

देशात न्यायालयीन व्यवस्थेबरोबर समांतर अर्धकालीन न्यायालये स्थापून सरकारने अधिकाराचे विघटन करण्याचा प्रयत्न केला आहे. तेथे अनेक वेळा हस्तक्षेप करून सोयीचा निकाल पदरात पाडून घेण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे न्यायाच्या गुणवत्तेवरसुद्धा परिणाम होतो. न्यायव्यवस्था लोकशाहीचा स्वतंत्र खांब असल्याचे संविधानात म्हटले आहे, परंतु आर्थिक बाबीसाठी तरी न्यायालयांना सरकारवर अवलंबून राहावे लागते. चुकीची कामे करणाऱ्या राजकारण्यांना कात्रीत पकडणारी यंत्रणा म्हणून ते न्यायव्यवस्थेला निधी देण्यास दुर्लक्ष करताना दिसून येते. त्यामुळेच न्यायदान प्रक्रियेला उशीर होत आहे, कधी कधी खालच्या कोर्टाने दिलेला निकाल त्यावर अपिलाचा निकाल होईपर्यंत वादी संपलेला असतो किंवा केसमधील तथ्य तरी संपलेले असते. न्यायमूर्ती चंद्रचूड यांनी जलद न्याय मिळण्यासाठी मोठ्या फेरबदलाची आवश्यकता असल्याचे अप्रत्यक्षरीत्या सुचवले आहे. त्याचाच बोध घेऊन सरकारने त्यासाठी उपाययोजना करून सर्वसामान्यांना न्याय देऊन त्यांचे जीवन सुखी कसे होईल, जलद न्यायासाठी तारीख पे तारीख टाळण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. तेव्हाच खऱ्या अर्थाने न्याय मिळाल्याचे सार्थक होईल इतकेच अपेक्षित आहे.

**- ॲड. गोरक्ष कापकर.**

## टुडेज ब्लॉग

# संगीतोपचार

**चांगल्या प्रकारचे संगीत ऐकल्यास निश्चितच त्याचा उत्तम परिणाम आपल्या आरोग्यावर दिसून येतो. येणाऱ्या काळामध्ये कुठल्याही प्रकारचे औषधोपचार न करता हेडफोन्स लावून केवळ संगीताचे श्रवण केल्याने अनेक जुन्या व्याधी दूर होत असल्याचे जर आपणास समजले तर यात नवल नाही. छत्तीसगड राज्यातील खैरागडमधील साल्हेवारा या गावात याची अंमलबजावणीदेखील केली जात आहे. हिंदुस्तानी शास्त्रीय संगीतामधील राग ऐकवून अनेकांच्या जुन्या व्याधी बऱ्या केल्या जात आहेत.**

गायन, वादन आणि नृत्य यांच्या समागमाला संगीत असे म्हणतात. संगीताची ही पुस्तकी व्याख्या असली तरी काही विद्वानांच्या मते रंजन करणारे शास्त्र म्हणजे संगीत होय. म्हणजेच ज्या ध्वनिलहरी ऐकून आपले मनोरंजन होते त्याला संगीत असे म्हणतात, परंतु संगीताने केवळ मनोरंजनच होते असे नव्हे, तर आधुनिक अभ्यासकांच्या मतानुसार संगीत हे आरोग्यासाठी फायदेशीर आहे. संगीताचा भौतिक गोष्टींवर परिणाम कसा होतो यासाठी एक सोपे उदाहरण समजून घेऊया. आपण कार चालवत असाल आणि आपल्या कारमध्ये संथ लयीत अभंग, भजन अथवा विरहगीत सुरू असेल तर आपल्या कारचा वेग नियंत्रित असतो. याउलट द्रुत लयीमधील एखादे पाश्चात्य संगीत सुरू असेल तर आपल्या कारचा वेग आपोआप वाढतो. नकळत आपल्याकडून कार जोरात चालवली जाऊ शकते.

आधुनिक व्यायामशाळा म्हणजेच जिममध्ये फास्ट म्युझिक



लावण्यामागे हेच कारण असावे. म्हणजेच संगीताचा भौतिक गोष्टींवर निश्चितच परिणाम होतो. चांगल्या प्रकारचे संगीत ऐकल्यास निश्चितच त्याचा उत्तम परिणाम आरोग्यावर दिसून येतो. येणाऱ्या काळामध्ये कुठल्याही प्रकारचे औषधोपचार न करता हेडफोन्स लावून केवळ संगीताचे श्रवण केल्याने अनेक जुन्या व्याधी दूर होत असल्याचे जर आपणास समजले तर यात नवल नाही. हिंदुस्तानी शास्त्रीय संगीतामधील राग ऐकवून जुन्या व्याधी बऱ्या केल्या जात आहेत.

भारतीय शास्त्रीय संगीत पद्धतीमध्ये निरनिराळे थाट निरनिराळ्या रागांची निर्मिती करतात. या रागांमध्ये निरनिराळे भावदेखील असतात. समजा आपण मानसिकरित्या अस्वस्थ आहात. अशा परिस्थितीमध्ये शांत ठिकाणी बसून भूप' अथवा बिलावल' रागाचे श्रवण केल्यास मन स्वस्थ होते आणि आपणास प्रसन्न वाटू लागते. इंसोमनिया म्हणजेच अनिद्रा या व्याधीमध्ये राग भैरवी' अथवा राग सोहनी' ऐकल्यास लाभ मिळेल. हृदयरोगामध्ये राग दरबारी' व राग सारंग' ऐकल्यास मदत होईल. हे दोन्हीही राग सितार वादनामध्ये ऐकल्यास उत्तम परिणाम दिसून येतात. उच्च रक्तदाबामध्ये विलंबित लयीत म्हणजेच कमी गतीमधील कुठलाही गीत प्रकार ऐकल्यास लाभ मिळू शकतो. त्याचप्रमाणे कमी रक्तदाबाच्या व्याधींमध्ये तीव्र गतीमधील गीत ऐकावे. ॲसिडिटीचा त्रास असेल तर 'राग खमाज' ऐकावा.


शारीरिकदृष्ट्या थकवा येत असेल तर 'राग जयजयवंती' ऐकावा. त्याचप्रमाणे स्मरणशक्तीचा अभाव असेल तर राग शिवरंजनी' ऐकल्यास स्मरणशक्तीमध्ये वृद्धी होते. म्हणूनच प्रत्येक विद्यार्थ्याने राग शिवरंजनीमधील विविध गीत प्रकार दररोज ऐकावा. डिप्रेशन अथवा कुठलाही मनोरोग असल्यास राग बिहाग' अथवा राग मधुवंती' ऐकावा. अशा व्यक्तींनी घुंगरू अथवा तबला वारंवार ऐकायला हवा.संगीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये संगीत उपचार पद्धतीचा परिणाम लवकर दिसून येतो. संगीताबद्दलची असणारी रुची आणि स्वरांची समज यामुळे त्यांच्यावर संगीत उपचार पद्धतीचा परिणाम अगदी कमी कालावधीमध्ये दिसून येतो. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने शास्त्रीय संगीत अथवा कुठलेही एखादे वाद्य नक्कीच शिकायला हवे. आपणास जर कुठल्याही रागांची अथवा स्वरांची समज नसेल तरीदेखील केवळ श्रवण केल्यानेसुद्धा आपणास लाभ मिळू शकतो. दररोज झोपण्याअगोदर आणि सकाळी उठल्याबरोबर अंदाजे १५ मिनिटांपर्यंत संगीत ऐकायला हवे. सुमारे १० ते १५ दिवसांमध्येच आपल्याला आश्चर्यकारक परिणाम दिसायला लागतील. मनातील भाव सकारात्मक असणे अत्यंत गरजेचे आहे.

**- साहील पाटील, एम. ए. संगीत.**

## बोधकथा

# 'मी' पणाचा त्याग

एका विख्यात संताला भेटण्यासाठी एक राजा आला आणि म्हणाला,'' तुम्ही मला त्या स्थितीमध्ये घेऊन जा, ज्या स्थितीमध्ये तुम्ही आहात.'' संताने म्हटले,'' महाराज मी तुम्हांला त्या अवस्थेत निश्चित घेऊन जाईन, पण माझी एक अट आहे. उद्या पहाटे चार वाजता तुम्ही एकटे माझ्या कुटीवर या.'' राजा म्हणाला,'' ठीक आहे.'' दुसऱ्या दिवशी पहाटे राजा कुटीवर आला, राजाने कुटीच्या दारापाशी येताच संताच्या नावाने हाक मारली. त्याबरोबर आत जागे असणाऱ्या संतांनी विचारले की कोण आले आहे, राजाने सांगितले,'' मी राजा आलो आहे'' संतांनी सांगितले की उद्या या. राजाला विचित्र वाटले पण तो तेथून निघून गेला. दुसऱ्या दिवशी पहाटे चार वाजता राजा एकटा पुन्हा कुटीपाशी गेला, त्याने हाक मारली, संतांनी तोच प्रश्न विचारला, राजाने यावेळी उत्तरात सुधारणा



केली कारण मी राजा आलो आहे हे वाक्य संतांना आवडले नसेल म्हणून राजाने सांगितले,'' मी आलो आहे'' संतांनी सांगितले, उद्या या. तिसरे दिवशी राजा पुन्हा गेला, दोन दिवसांप्रमाणेच घडले यावेळी राजाने उत्तर दिले, 'मी आहे'' संतांनी पुन्हा उद्या या असे सुनावले. राजा चौथ्या दिवशी मात्र विचारात पडला आता जावे की नको कारण संत काहीही उत्तर दिले हाकलून देतात, त्यापेक्षा न जाणेच बरे या विचारात होता. मात्र आता तीन दिवस हाकलून दिले आहे, आता चौथ्या दिवशी जाऊन बघू. चौथ्या दिवशी पण राजा गेला, त्याने संतांच्या नावाने हाक मारली, संतांनी आतूनच विचारले, कोण आहे, मात्र यावेळी राजाला काय उत्तर द्यावे हे सुचले नाही. तो गप्प राहिला. मग काही क्षणातच आतून संत बाहेर आले, त्यांनी राजाला जवळ घेतले, घट्ट मिठी मारली आणि म्हणाले, 'राजन तुम्ही परीक्षेत उत्तीर्ण झालात, पहिले तीन दिवसात तुमच्या उत्तरात तुम्ही मी' आलो असे उद्गार काढले पण मी तर तुम्हांला एकट्यानेच बोलावले होते. तुम्ही तुमच्या मी पणाला बरोबर घेऊन आलात. मानवी जीवनात या मी पणाला काहीही स्थान नाही. मी पणा सोडला की खूप काही शिकावयास मिळते'' **तात्पर्य- मानवाने 'मी' पणा सोडल्यास खूप काही प्राप्त होते. 'मी' पणाचा मृत्यू ज्यादिवशी मानवातून होतो तो त्यादिवशी संतत्वाकडे वाटचाल करू लागतो.**

## जन्म हा अखेरचा

# अकायस्थल - २



मी शरीर आहे असा देहाभिमान ज्याने सोडला आहे, मी शरीरापेक्षा वेगळा आहे, असा भाव ज्याच्या मनात दृढ झाला आहे आणि ज्याचे मन शिवात विलीन झाले आहे, त्याच्या दृष्टीने समग्र प्रपंच हेच एक शरीर असते. तो केवळ आपल्या एका शरीरात राहत नसतो तर प्रपंचातल्या सर्व शरीरात त्याचे वास्तव्य असते.

ममत्वापासून मुक्त होण्याचे दोन मार्ग शास्त्रकारांनी सांगितले आहेत. ममत्व सोडून देणे हा एक आणि ममत्व सोडता येत नसेल तर ते समग्र विश्वाएवढे व्यापक करणे, वाढवणे हा दुसरा मार्ग. तुमचे ममत्व जर प्रपंचाला व्यापून राहिले तर तुम्ही परमात्मस्वरुपच व्हाल. परमात्मा आणि आपण यामध्ये एवढाच फरक आहे. आपण केवळ आपल्या घरालाच स्वत:चे घर मानतो. परंतु परमात्म्याच्या दृष्टीने प्रपंचातील समस्त घरे त्याचीच असतात. हे घर माझे, हे घर दुसऱ्याचे असा भेद त्याच्या ठिकाणी नसतो. जीवात्म्याच्या ठिकाणी व्यष्टीभावना असते तर परमात्म्याच्या ठिकाणी समेष्टीभावना असते. एखाद्या दुकानात जाऊन एका ताग्यातून तुम्ही शर्टसाठी कापड विकत घेतली. ते शिवून अंगात घातले. जर त्या दुकानात आग लागली आणि इतर कापडांबरोबर ज्या ताग्यातून तुम्ही कापड घेतले तो तागाही भस्म झाला तर तुम्हांला दु:ख होत नाही. आपले शर्ट सुरक्षित आहे. ते जर जळाले नाही तर बस झाले, असे तुम्ही समाधान मानता. यालाच व्यष्टीभाव असे म्हणतात.

**(क्रमश:) - काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

## जनमानस

# कंत्राटी रोजगार योजना अनिश्चिततेत भर घालणारी

तंत्रज्ञानाचे बदलते प्रवाह पाहता मोठे उद्योजक नव्या नोकऱ्या देण्याऐवजी स्वयंचलित यंत्रांना पसंती देत असल्यामुळे वाढत्या लोकसंख्येतील रोजगार इच्छुकांना किती प्रमाणात रोजगार उपलब्ध होऊ शकतील याचा अंदाज बांधणे कठीण आहे. वीज, गॅस, पाणी व नागरी पुरवठा करणाऱ्या यंत्रणा तसेच बँका, वित्त क्षेत्र, माहिती तंत्रज्ञान, शिक्षण इंजिनिअरिंग, मेडिकल, कायदे सेवा-वकिली व्यवसाय इत्यादी क्षेत्रांत हंगामी स्वरूपाच्या रोजगार संधी उपलब्ध होत आहेत. हाती घेतलेल्या कामांची पूर्तता झाल्यानंतर नोकऱ्या गमावणाऱ्यांचे काय होणार? यासारखे अनेक प्रश्न निर्माण यापुढे होणार आहेत. विकासाच्या वेगाची खात्री विविध निर्णयांवर अवलंबून असते त्यामुळे नोकरी व्यवसायांत अनिश्चितता वाढू लागली आहे. भारतात दरवर्षी करोडोंच्या संख्येने रोजगारांची मागणी वाढत आहे. तिथे मानवी रोजगार की यांत्रिकीकरणावर भर द्यावा असे आव्हानात्मक प्रश्न निर्माण होत आहेत. सरकारने देखील स्वतः च्या अखत्यारीतील उद्योग, बँका यांचे खाजगीकरण करण्याचा मार्ग पत्करला आहे. तेथील नोकरभरतीसंबंधी निर्णय आता खाजगी कंपन्या/मालकांच्या हाती जात आहेत. त्यामुळे तेथेही दीर्घकालीन नोकऱ्यांची शाश्वती उरलेली नाही. व्यावसायिक तथा पदव्युत्तर प्रशिक्षण पूर्ण करणारी नवी तरुण पिढी देशाबाहेरील कंपन्यांत नोकरी व्यवसायाकरिता पसंती देत आहे ती ह्याच कारणांमुळे. येथील तरुणांच्या शिक्षणाचा, कौशल्याचा, मेहनतीचा उपयोग इतर देश व तेथील व्यवस्थापने करून घेत राहणार याची सरकारांनी नोंद घेत आपली धोरणे, निर्णय प्रक्रिया देशासाठी अधिक तारक ठरतील, याची दखल घेऊन त्यानुरूप बदल केल्यास भावी पिढ्यांचा स्वदेशाविषयी असणारा आदर अधिक दृढ होऊन त्या स्वदेशातच सेवा करणे पत्करतील.

**- राजन पांजरी, जोगेश्वरी.**

# हॉकीचे जादूगार : मेजर ध्यानचंद

याच दिवशी हॉकीचे जादूगार ध्यानचंद यांचा जन्म २९ ऑगस्ट १९०५ या दिवशी अलाहाबाद येथे राजपूत घराण्यात झाला. त्यांचे वडील सोमेश्वर दत्त सिंग हे सैन्यात होते. त्यांच्या वारंवार बदल्या होत असत. त्यामुळे ध्यानचंद यांनाही अनेक ठिकाणी जाण्याचा योग आला. ते वयाच्या १६व्या वर्षी सैन्यात १९२२ साली सैन्यात भरती झाले. ते तेथे हॉकी खेळावयास शिकले. त्यांचे सैन्यातील बाल तिवारी हे हॉकीतील गुरु होत. त्यांनीच ध्यानचंद यांना हॉकीचे प्राथमिक धडे दिले. खरे पहिले असता ध्यानचंद यांचे नाव ध्यानसिंग असे होते. तथापि ते चंद्राच्या प्रकाशात हॉकी खेळत असत. त्यामुळे त्यांचे नाव ध्यानचंद असे पडले गेले. ध्यानचंद हे रेजिमेंटच्या विविध स्पर्धेत हॉकी खेळू लागले. त्यामुळे त्यांची निवड न्यूझीलंड येथील स्पर्धेत खेळण्यासाठी १९२६ साली झाली. तेथे एकूण १८ सामन्यात त्यांनी विजय मिळविले. दोन बरोबरी व एका सामन्यात निसटता पराभव झाला. त्यांचे हॉकी खेळताना चेंडूवर जबरदस्त नियंत्रण असे. जणू ते हॉकीतील एका निष्णात जादूगार भासत. त्यांचे चेंडूवरील नियंत्रणही खास असे. काही लोकांना त्यांचं हॉकी स्टिकमध्ये चुंबक आहे असेही वाटे.

१९३५ साली विख्यात क्रिकेटपटू डॉन ब्रॅडमन हे त्यांना भेटले होते. त्यावेळी त्यांनी ध्यानचंद यांचे हॉकीतील चेंडू वळविण्याचे सामर्थ्य पाहून कौतुक व्यक्त केले होते. ध्यानचंद यांची भावना हॉकी हा सांघिक खेळ आहे अशीच होती. त्यांनी एकूण तीन ऑलिम्पिक स्पर्धेत भारतीय हॉकीला सुवर्णपदक मिळवून दिले. १९२८ ॲमस्टरडॅम, १९३२ लॉस अँजेलिस व १९३६ साली बर्लिन असे हे तीन ऑलिम्पिक होते. १९३६ साली बर्लिन येथे जर्मनीचा हुकूमशहा ॲडॉल्फ हिटलर हा हॉकीचा अंतिम सामना पाहत होता. जर्मनी विरुद्ध भारत हा सामना होता. भारताने जर्मनीचा ८ विरुद्ध १ गोल ने पराभव केला. त्यानंतर हिटलरने त्यांना भेटावयास बोलाविले. त्या भेटीत त्यांनी ध्यानचंद यांना जर्मन सैन्यात मोठे पद व जर्मन नागरिकत्व देण्याचे आश्वासन दिले. तथापि बाणेदार ध्यानचंद यांनी ही ऑफर धुडकाविली व आपला मातृभूमी विषयी असणारा देशाभिमान प्रकट केला.



भारतीय हॉकीत १९२८ ते १९६४ हे सुवर्ण युग मानले जाते. यामध्ये ८ ऑलिम्पिकमध्ये भारताने ७ सुवर्णपदके मिळविली होती. त्यांनी आपल्या हॉकीतील कारकिर्दीत एकूण १८५ मॅचेस खेळल्या होत्या व ५७० गोल्स केले होते. १९५६ मध्ये त्यांनी हॉकी खेळातून आपली निवृत्ती जाहीर केली होती. त्यावेळी त्यांना भारत सरकारने 'पद्मभूषण' ही पदवी देऊन गौरव केला होता.

**राष्ट्रीय क्रीडा दिवस**

१९८० साली भारत सरकारने त्यांच्या स्मरणार्थ पोस्टाचे तिकिट काढले होते. सैन्यातून सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांची नेमणूक पतियाळा येथील राष्ट्रीय क्रीडा अकादमीत मुख्य प्रशिक्षक म्हणून झाली होती. त्यांच्या जन्मदिनी दरवर्षी भारत सरकारतर्फे खेळातील कामगिरीबद्दल अर्जुन व द्रोणागिरी हे पुरस्कार दिले जातात. ध्यानचंद यांचे ३ डिसेंबर१९७९ रोजी दिल्ली येथे निधन झाले. नुकतेच पंतप्रधान मोदींनी या दिवशी देण्यात येणाऱ्या राजीव गांधी खेलरत्न पुरस्काराचे नाव 'मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार' असे केले आहे.

ध्यानचंद यांचा जन्म दिवस २९ ऑगस्ट हा भारत सरकारतर्फे 'राष्ट्रीय क्रीडा दिवस' म्हणून २०१२ पासून साजरा होतो. फिट इंडिया म्हणून सुद्धा हा दिवस साजरा केला जातो. या दिवशी खेळाविषयी जागृती केली जाते. अजूनही आपण जागतिक क्रीडा स्पर्धेत खूपच मागे आहोत. राष्ट्रकुल स्पर्धेत आपला ७२ देशांच्या स्पर्धेत चौथा नंबर लागला. ऑलिम्पिक स्पर्धेत भारताला केवळ ७ पदके मिळाली व जागतिक क्रमवारीत ४८ वे स्थान मिळाले. तथापि हॉकीतील ४१ वर्षानंतर आपण पुरुष गटात ब्राँझ पदक मिळविले. महिला संघानेही चुरशीची लढत देऊन कौतुकास्पद खेळ केला. अनेक राज्य सरकारे व केंद्र सरकार अनेक खेळाविषयी जागृती निर्माण करत आहेत. खेळाडूंना प्रोत्साहनही दिले जात आहे. या निमित्ताने जगात भारत क्रीडा क्षेत्रात प्रथम क्रमांकाचे राष्ट्र व्हावे हीच इच्छा. ध्यानचंद यांना त्यांच्या हॉकीतील नैपुण्याबद्दल व प्राविण्याबद्दल मरणोत्तर 'भारतरत्न' पुरस्कार देऊन भारत सरकारने त्यांचा गौरव करावा. सैन्यातून सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांची नेमणूक पतियाळा येथील राष्ट्रीय क्रीडा अकादमीत मुख्य;प्रशिक्षक म्हणून झाली होती . त्यांच्या जन्मदिनी दरवर्षी भारत सरकारतर्फे खेळातील कामगिरीबद्दल अर्जुन व द्रोणागिरी हे पुरस्कार दिले जातात . ध्यानचंद यांचे ३ डिसेंबर१९७९रोजी दिल्ली येथे निधन झाले. नुकतेच पंतप्रधान मोदींनी या दिवशी देण्यात येणाऱ्या राजीव गांधी खेलरत्न पुरस्काराचे नाव मेजर ध्यानचंद खेल रत्न पुरस्कार असे केले आहे या दिवशी खेळाविषयी जागृती केली जाते अजूनही आपण जागतिक क्रीडा स्पर्धेत खूपच मागे आहोत .राष्ट्रकुल स्पर्धेत आपला ७२ देशांच्या स्पर्धेत चौथा नंबर लागला . ऑलिम्पिक

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R.N.I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail.com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.



## फिट राहण्यासाठी शारीरिक हालचाल महत्त्वाची : डॉ. मगर

सुराज्य/सोलापूर : कोणत्याही खेळातील खेळाडूला फिट राहण्यासाठी रोज शारीरिक हालचाल (व्यायाम) फार महत्वाचे आहे, असे मत अस्थिरोग तज्ञ व स्पोर्टस मेडीसनवर पदवीधारण केलेले डॉ. सुमेद मगर यांनी व्यक्त केले. जिल्हा क्रीडा महासंघाच्या वतीने राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी महासंघाचे सचिव महेश गादेकर, झुबीन अमेरिया, चंद्रकात रेंबर्सू, के टी पवार, सुदेश मालप, झेड. एम. पुणेकर, प्रा डॉ किरण चौगुले, प्रा आनंद चव्हाण उपस्थित होते. डॉ. सुमत मगर म्हणाले प्रत्येक खेळातील खेळाडूला फिट राहण्यासाठी रोज तीस ते साठ मिनिट शारीरिक हालचाल (व्यायाम) केलेच पाहिजे, तसेच शारीरिक हालचालीमुळे मानसिक आरोग्य उत्तम राहते. सर्वसामान्य व्यक्तीलाही फिट राहण्यासाठी हालचाल करणे महत्वाचे आहे. शरीरितील महत्वाचे अवयवाच्या क्षमता वाढविण्यासाठी आठवड्यातील तीन ते पाच दिवस व्यायामाचे नियोजन करण्याची गरज आहे. व्यायाम करताना शरीराची क्षमता नुसार लोड घेतले पाहिजे. वर्कआउट केल्यानंतर कुलडाउनाचे व्यायाम केल्यानंतर दुखापत होणार नाही. महेश गादेकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. किरण चौगुले यांनी सूत्रसंचालन केले. चंद्रकात रेंबर्सू यांनी आभार मानले.

## निंबर्गीत ई-वोटर हेल्पलाईनचा प्रशिक्षण कार्यक्रम

सुराज्य/दक्षिण सोलापूर : निंबर्गी येथील श्री बसवेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात व निवडणूक आयोग व जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर यांच्या आदेशान्वये आधार कार्ड व मतदान कार्ड लिंक करणे कामी ई-वोटर हेल्पलाइनचे प चे प्रशिक्षण संपन्न झाले. यावेळी या कार्यक्रमाला निंबर्गी मंडलचे अधिकारी अमरसिंह पंतुवाले भंडारकवठे गावचे तलाठी राम केंगनाळकर निंबर्गीचे तलाठी श्याम काळे उपस्थित होते. यावेळी प्रशालेचे प्राचार्य एन. एम. झाडबुके यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व उपस्थितांचे स्वागत केले. श्याम काळे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना व शिक्षकांना ई-वोटर हेल्पलाइन प चे प्रशिक्षण देऊन यशस्वीरित्या रजिस्ट्रेशन करून घेतले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रशालेतील सर्व अधिव्याख्याते, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार अधिव्याख्याते वि. स. खांडेकर यांनी मानले.

# टिळकांना सार्वजनिक गणेशोत्सवाची प्रेरणा देणारा आजोबा गणपती

**दीडशे वर्षाकडे वाटचाल**

सुराज्य/दीपक शेळके



**बाप्पा आले... भाग-८**

धार्मिक एकीतून निर्माण होणारे बळ राष्ट्रीय चळवळीकडे वळावे व सर्व समाजाला एकत्र आणून स्वातंत्र्याची चळवळ सामान्य जनतेपर्यंत पोहोचावी या उद्देशाने लोकमान्य टिळकांनी सन १८८३ मध्ये गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरूप आणले. त्यापूर्वी आठ वर्षे अगोदर सोलापुरातील शुक्रवार पेठेतील जुन्या पिढीतील मान्यवर मंडळींनी एकत्रित येऊन सार्वजनिक स्वरूपात आजोबा गणपती ची स्थापना करण्याचा मान मिळविला होता. लोकमान्य टिळकांना याच आजोबा गणपतीमुळे प्रेरणा मिळाल्याचे सांगितली जाते.

श्रध्दानंद समाजाच्या सार्वजनिक आजोबा गणपतीला मोठा इतिहास आहे. सोलापुरातील शुक्रवार पेठेत आजोबा गणपतीची प्रतिष्ठापना झाली सध्या माणिक चौकातील आकर्षक व भव्य मंदिरामध्ये या मानाच्या आजोबा गणपती विराजमान आहे लाला मुनशिराम हे लाहोर उच्च न्यायालयात प्रसिध्द वकील होते. संन्यासाची दीक्षा घेतल्यानंतर ते स्वामी श्रध्दानंद या नावाने ओळखले जात होते. १२ डिसेंबर १९२६ रोजी त्यांच्या निवास स्थानी जाऊन एका धर्मांध माथेफिरूने गोळ्या झाडून त्यांचा खून केला. या घटनेच्या निषेधार्थ सोलापुरात बंद पाळण्यात आला. त्या दिवशी सोलापुरातील सिद्रामप्पा फुलारी, रेवणसिध्द खराडे, नागप्पा शरणार्थी, नागय्या धोत्रे, इरप्पा कोरे, आदींनी त्रिपुरांतकेश्वर मंदिरात एकत्र येऊन स्वामी श्रध्दानंद यांची स्मृती व कार्य नागरिकांसमोर ठेवण्यासाठी श्रध्दानंद समाजाची स्थापना केली. समाजाच्या वतीने श्रध्दानंद समाजाच्या वतीने गणेशोत्सव साजरा निर्णय घेतला मात्र यातून तरुणांमध्ये राष्ट्र भक्ती निर्माण करण्याच्या उद्देश ठेवण्यात आला

शहरातील प्रमुख मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळाच्या विसर्जन मिरवणुकित आजोबा गणपतीचा मान आहे. मिरवणुकित सर्वात शेवटचा गणपती हा आजोबा गणपती असतो. या गणपती समोर ५०० हून अधिक युवकांचा शिस्तबध्द व लयबध्द लेझीम पथक, २०० मुला मुलींचे नयनरम्य व लक्षवेधक ढोलपथक असते. एकसारखा पांढरा शुभ्र गणवेश, उत्साही तरुणाई, मर्यादित आवाजातील वाद्ये यामुळे मिरवणूक पाहणाऱ्यांच्या डोळ्यांचे पारणे फिटते व सर्वांना ठेका धरायला लावते.

### टिळकांना प्रेरणा

अप्पासाहेब वारद यांनी एकदा लोकमान्य टिळकांना आजोबा गणपती गणेशोत्सवातील पान-सुपारी कार्यक्रमासाठी आणले एकत्रित येणाऱ्या नागरिकांना पाहून लोकमान्य टिळक यांना सार्वजनिक गणेशोत्सवाची कल्पना सुचली. आजोबा गणपती प्रेरणा घेऊन गणपती सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात करत यातून स्वातंत्र्याचा लढा उभा केला असल्याचे जुने जाणकार सांगतात.

### इको फ्रेंडली मूर्ती

सन १८८५ साली रद्दी कागद, कामत्या, डिंक तसेच शाडूची माती पासून. इको फ्रेंडली पर्यावरण पूरक साधनांचा वापर करून श्रीं' ची सुंदर व सुबक मूर्ती तयार करण्यात आली. १८८५ सालची मूर्ती जुनी झाल्याने १०८ वर्षानंतर १९९३ साली केरळच्या कलाकार यांच्याकडून शास्त्रशुध्द पध्दतीची मूर्ती बनवून घेण्यात आली आहे.

### भक्तांच्या नवसाला पावणार आजोबा गणपती

सन १९९४ मध्ये माणिक चौक येथे मंडळाच्या स्वतःच्या जागेत आजोबा गणपतीचे आकर्षक मंदिर उभारण्यात आले. मंदिरात नित्यनियमाने शास्त्रोक्त व विधिवत पूजा, महाआरती केली जाते भक्तांची मनोकामना पूर्ण करणार आजोबा गणपती असल्याने भक्ताची मोठी गर्दी होते भक्तांनी दिलेल्या देणगी तून सोने, चांदीचे आकर्षक दागिने, चांदीचे सिंहासन व डोक्यावर सोन्याचा मुकुट, अंगावरील विविध दागिने केली आहेत.

## उद्योजकांना मिळणाऱ्या सबसिडीचा लाभ घ्या

**गो-इजी बिजनेसचे येळवे यांचे आवाहन**

**सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशनची वार्षिक सर्वसाधारण सभा**

सुराज्य/सोलापूर

उद्योजक सभासदांना केंद्र आणि राज्य शासनाकडून मोठ्या प्रमाणात सबसिडी मिळत आहे. याचा लाभ उद्योजकांनी घ्यावा, असे आवाहन गो इजी बिजनेसचे संदीप येळवे यांनी केले.

सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशनची २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा जयकुमारजी पाटील उद्योग भवन, चिंचोळी एमआयडीसी येथे शनिवारी, २७ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता संपन्न झाली. यावेळी उपस्थित उद्योजकांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशनच्या वार्षिक अहवालाचे अनावरण अध्यक्ष राम रेड्डी, उपाध्यक्ष गणेश सुत्रावे, सिध्दाराम चिट्टे, सचिव वासुदेव बंग, सहसचिवा रामेश्वरी गायकवाड आणि खजिनदार कमलेश शाह यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी गेल्या वर्षभरात असोसिएशनशी जोडल्या गेलेल्या नवीन सभासदांचे स्वागत माजी अध्यक्ष शरदकृष्ण ठाकरे आणि माजी अध्यक्ष केशव रेड्डी, कार्यकारिणी सदस्य तारासिंग राठोड, अभिषेक तापडीया यांनी रोप देऊन केले. असोसिएशनचे सचिव वासुदेव बंग यांनी गतवर्षीच्या कार्याचा आढावा घेतला. खजिनदार कमलेश शाह यांनी वार्षिक अकाउंट्सचे वाचन केले. त्यानंतर उपस्थित असलेले विजय कलधोणे आणि रश्मी कुलकर्णी यांनी सभासदांच्यावतीने प्रातिनिधिक मनोगत व्यक्त केले.

अध्यक्ष राम रेड्डी यांनी उद्योजकांना भेडसावत असलेल्या विविध समस्या, विमान सेवा, एम. आय. डी. सी. रोड, दिवाबत्ती, पाणी पुरवठा व ग्रामपंचायत कर याविषयी होत असलेल्या पाठपुराव्या बाबत माहिती दिली. तसेच सभासदांनी बैठकीला नियमित येण्याचे आवाहन केले. कोरोना काळात केलेल्या आर्थिक सहाय्याबद्दल त्यांनी सभासदांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेचे मॅनेजर विनायक दुदगी यांनी केले. आभार सह सचिवा रामेश्वरी गायकवाड यांनी मानले.

## लवंगी येथील नदीच्या पात्रात अनोळखी इसमाचा मृतदेह

**खून केलेल्या अवस्थेत आढळला**




सुराज्य/सोलापूर

लवंगी (ता. दक्षिण सोलापूर) येथील भीमा नदीच्या पात्रात एका ३५ ते ४० वर्षीय अनोळखी इसमाचा मृतदेह खुन केलेल्या अवस्थेत आढळून आल्याने परिसरात खळबळ उडली आहे. ही घटना शनिवारी सायंकाळी उघडकीस आली.

लवंगी येथील सिध्दाराम बगले यांच्या शेता जवळील नदीच्या पाण्यात काल सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास मृतदेह पाण्यावर तरंगताना आढळून आला. मृतदेहाचा गळा दाबून खून केल्याचे पोलिसांच्या प्राथमिक तपासात निष्पन्न झाले. मृतदेह येथे रंगाने सावळा असून त्याच्या अंगावर निळी पॅन्ट आणि पांढरी बनियन आहे. त्याच्या डाव्या हातावर लाल रंगाचा दोरा आहे. कोणीतरी अनोळखी इसमाने त्याचा गळा दाबून खून केला. आणि पुरावा नष्ट करण्यासाठी हे कृत्य केल्याची नोंद पोलिसात झाली. मृतदेहा संबधी कोणास माहिती असल्यास त्यांनी मंद्रूप पोलिसांशी संपर्क साधावा. असे आवाहन फौजदार करपे यांनी केले आहे.

## निधनवृत्त

### बाळासाहेब नवले



सुराज्य/वेळापूर : वेळापूर येथील कृषी अधिकारी बाळासाहेब नवले (वय ६०) यांचे हृदयविकारने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, जावई असा परिवार आहे.

### गुरुलिंगप्पा वंगे



सुराज्य/अक्कलकोट : चपळगाववाडी (ता. अक्कलकोट) येथील सेवानिवृत्त सेक्रेटरी गुरुलिंगप्पा शिवलिंगप्पा वंगे (वय ७६) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली असा परिवार आहे. वकिल शशिकांत, विरेश यांचे वडिल व निवृत्त ग्रामसेवक शिवलिंगप्पा यांचे काका होत.

## पिंजरवाडीत लाथाबुक्क्यांनी मारहाण; दोघे जखमी



सुराज्य/सोलापूर

पिंजरवाडी (ता. दक्षिण सोलापूर) येथे भावकीतील शेत जमिनीच्या वादातून दगड आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत सैपन घुडूभाई नदाफ (वय ३६) आणि शहनाज नदाफ (वय ३४) हे दोघे जखमी झाले. ही घटना रविवारी सकाळच्या सुमारास घडली. त्यांना उपचारासाठी शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांचा भाऊ मिरा घुडूभाई नदाफ त्याचा मुलगा रफिक आणि अन्य दोघांनी मारहाण केली. अशी प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.




# श्री पांडुरंग कारखान्यास बेस्ट को-जनरेशन पुरस्कार



सुराज्य/श्रीपूर

श्री पांडुरंग सहकारी साखर कारखान्यास को-जनरेशन असोसिएशन ऑफ इंडियाचा बेस्ट को जनरेशन प्लांट हा पुरस्कार केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, खा. शरदचंद्र पवार, को जनरेशन असोसिएशन ऑफ इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक संजय खाताल, केंद्रिय सचिव दिनेश जगदाळे, को जनरेशन असोसिएशन ऑफ इंडियाचे उपाध्यक्ष जयप्रकाश दांडेगावकर यांच्या हस्ते शनिवार रोजी हॉटेल ललीत मुंबई येथे प्रदान करण्यात आला.

श्री पांडुरंग सहकारी साखर कारखान्याने महाराष्ट्रात पहिल्यांदा को-जनरेशन प्लॅंट. उभारून सहकारी साखर कारखान्यामध्ये आदर्श निर्माण केला आहे. को-जनरेशनमध्ये केलेल्या सर्वोच्च कामगिरीची विचार करुन को-जनरेशन असोसिएशन ऑफ इंडिया या संस्थेने ६७ के. जी. बॉयलरच्या आतील को- जनरेशनसाठी देशपातळीवरील प्रथम क्रमांकाचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. पुरस्कार देताना कारखान्याने को जनरेशन मध्ये केलेल्या उत्कृष्ट कामगिरीचा उल्लेख केंद्रिय मंत्री नितीन गडकरी यांनी करून कारखान्याचे कौतुक केले. यावेळी विश्वजीत कदम को जनरेशन असोसिएशन ऑफ इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक संजय खताल, केंद्रीय सचिव दिलीप जगदाळे आदी उपस्थित होते.

सदरचा पुरस्कार कारखान्याचे चेअरमन प्रशांतराव परिचारक, व्हाईस चेअरमन कैलास खुळे, संचालक तानाजी वाघमोडे, कार्यकारी संचालक डॉ यशवंत कुलकर्णी आदींनी स्वीकारला. को-जनरेशन असोशिएशन ऑफ इंडिया यांनी हंगाम २०१८-१९ ते २०२०-२१ या तीन वर्षाच्या कालावधीत केलेल्या कामगिरीच्या आधारावर ६७ ज्ञस च्या आतील बॉयलर असणाऱ्या को-जनरेशन प्रकल्पास देशपातळीवरील प्रथम क्रमांकाचा सर्वोकृष्ट पुरस्कार दिला आहे. त्यामध्ये श्री पांडुरंग कारखान्याने कमीत कमी बगॅसमध्ये जास्तीत जास्त विज निर्मीती, अंतरराष्ट्रीय पातळीवर मिळालेले कार्बन क्रेडीट, कमी उत्पादन खर्च, कारखान्यास मिळालेले खड्ज सर्टीफिकेट व कारखान्याचे असलेल्या सुरक्षा योजना, कारखान्याचा सौर उर्जा प्रकल्प, कमीत कमी पाणी वापर, पाण्याचा पुर्णवापर, पाचटाचा वापर करुन विज निर्मीती, को-जनरेशन प्लँटची क्षमता वापर या सर्व बाबींचा विचार करुन पुरस्कार देण्यात आला आहे. श्री पांडुरंग कारखान्याचा ज्यावेळी को-जन प्लँट उभा केला त्यावेळी महाराष्ट्रात को-जनरेशन प्लँटचे प्रमाण कमी होते परंतू श्रध्देय सुधाकरपंत परिचारक यांच्या आशिर्वादाने व कारखान्याचे चेअरमन प्रशांतराव परिचारक व संचालक मंडळाचे सहकार्याने कारखान्याचा को-जन प्लँट यशस्वी चालुन त्यामधुन जास्तीत जास्त विज निर्मीती करुन कारखान्यास आर्थीक उत्पान्नाचा स्त्रोत निर्माण केला आहे. कारखान्याने को-जनरेशनमध्ये केलेल्या सर्वोच्च कामगिरीमुळेच कारखान्यास को-जनरेशन असोसिएशन ऑफ इंडिया या संस्थेकडुन देशपातळीवरील सर्वोच्च को-जन प्लँट म्हणुन गौरविणेत आले आहे.

यावेळी कारखान्याचे चेअरमन प्रशांतराव परिचारक, व्हा. चेअरमन कैलास खुळे यांनी कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी व अधिकारी, कामगार यांचे अभिनंदन केले. त्याचबरोबर पांडुरंग कारखान्यास कोजन मॅनेजर सचिन विभुते यांना बेस्ट कोजन मॅनेजर हा पुरस्कार, समीर सय्यद यांनाही बेस्ट इन्स्ट्रुमेंट मॅनेजर म्हणून पुरस्कार, व सत्यवान जाधव यांना बेस्ट डी एम प्लांट मॅनेजर म्हणून पुरस्कार याप्रमाणे कारखान्यास को जनरेशन असोसिएशन ऑफ इंडिया कडून पुररसकार असे आज एकूण चार पुरस्कार प्रदान करण्यात आले.

### आजपर्यंत ४१ पुरस्कार

कारखान्यास आज पर्यंत ४१ पुरस्कार मिळाले असून सदरचे पुरस्कार कारखान्याचे चेअरमन मा आ प्रशांतराव परिचारक, व्हा. चेअरमन कैलास खुळे, सर्व संचालक मंडळ आणि अधिकारी यांनी केलेल्या सर्वोच्च कामगिरीच्या जोरावर मिळाले असून यापुढेही कारखाना अशाच प्रकारे सर्वोच्च कामगिरी करेल.

– **डॉ. यशवंत कुलकर्णी,** कार्यकारीसंचालक पांडुरंग कारखाना.

## सूर्या हॉटेलजवळ कोयत्याने हल्ला

सुराज्य/सोलापूर : मेकॅनिक चौकातील सूर्या हॉटेल जवळील बोळात अपघाताच्या किरकोळ भांडणातून कोयत्याने पाठीत वार केल्यामुळे आकाश मुरलीधर नागणे (वय २५ रा. निराळे वस्ती) हा तरुण जखमी झाला.

ही घटना रविवारी दुपारच्या सुमारास घडली. त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. संकेत शिंगारे, पवन गवळी आणि अन्य तिघा जणांनी मारहाण केल्याची नोंद फौजदार चावडी पोलिसात झाली आहे.





## जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धेत आर्या पब्लिक स्कूलचे यश

**सुराज्य/माढा** : माढ्यातील आर्या पब्लिक स्कूलमधील विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय चित्रकला व सुंदर हस्ताक्षर स्पर्धेत उज्वल यश मिळवले असून यामधील सुंदर हस्ताक्षर स्पर्धेमध्ये सिया संकल्प शहा प्रथम क्रमांक तर चित्रकला स्पर्धेत आर्यन लक्ष्मणराव राऊत, आर्या प्रवीण शिंदे व स्वप्निल सुनील पाटील यांनी द्वितीय क्रमांक व राजकन्या कल्याण बाबर व कृष्णाली गोरख चांदवड तृतीय क्रमांक मिळवला आहे.

सर्व विद्यार्थ्यांना कलाशिक्षक अण्णाराव खंडागळे यांचे मार्गदर्शन मिळाले. प्राचार्य सागर थोरात यांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आ. बबनराव शिंदे, जि. प. सदस्य रणजित शिंदे, संस्थेच्या मार्गदर्शिका प्रणिती शिंदे, प्राचार्य सागर थोरात, अरुण माने, तुषार तोडकरी, रणजीत उबाळे, कलाशिक्षक अण्णाराव खंडागळे, मनोज नागटिळक प्रवीण नारायणकर, सुरज आवारे, दीपक माने, विद्या महाडिक, सारिका यादव, संध्या सरडे, वंदना गोसावी, कृष्णा जठार, तृप्ती देशमुख, मेघा भांगे, संजीवनी ढोबळे, वैष्णवी पिलीवकर, शुभम सरते, महेश मोठे, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.



## बालाजी चौगुले यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा

**सुराज्य/सोलापूर** : युवा सेना जिल्हाप्रमुख बालाजी चौगुले यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. यावेळी चौगुले यांना विविध मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या. मजरेवाडी जि. प. प्राथमिक शाळा, टिकेवरवाडी जि.प. शाळा आणि शांताई अनाथाश्रम येथील मुलांना खाऊ वाटप करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटपही करण्यात आले.

यावेळी उपजिल्हाप्रमुख भीमाशंकर, म्हेत्रे, दत्तोपंत वानकर, भाजप नेते अप्पासाहेब पाटील वडकबाळकर, शिवसेना उपजिल्हाप्रमुख संतोष पाटील, विद्यार्थी सेना जिल्हाप्रमुख लहु गायकवाड, नारुद्दीन मुल्ला, नामदेव पवार, नितीन भोपळे, आनंद बुक्कानुरे, रविकांत कांबळे, सचिन गंधुरे, रोहित तडवळकर, राहुल गंधुरे यांच्यासह मान्यवरांनी चौगुले यांचा सत्कार करत पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

## नियमांचे पालन करूनच गणेशोत्सव साजरा करावा : गायकवाड

**सुराज्य/पिलीव** : दोन वर्षाच्या कोरोना महामारी व लॉकडाऊनच्या निर्बंधानंतर साजरा होत असलेला गणेशोत्सव सार्वजनिक गणेश मंडळांनी शासनाच्या व न्यायालयाने ठरवून दिलेल्या नियमानुसार कायद्याचे व शिस्तीचे पालन करून गणेश उत्सव अत्यंत आनंदी वातावरणात साजरा करण्याचे आव्हान पिलीव येथे आयोजित सार्वजनिक गणेश उत्सव मंडळांच्या बैठकी मार्गदर्शन करताना माळशिरस पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दीपरतन गायकवाड यांनी केले.

यावेळी पिलीव, सुळेवाडी, बचेरी काळमवाडी, शिंगोर्णी, कुसमोड, झिंजेवस्ती आदी गावातील काळमवाडीचे माजी सरपंच दादासाहेब शिंगाडे, पिलीव गावचे तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष दामोदर लोखंडे, सुळेवाडीचे सरपंच बापूराव करडे, पोलीस पाटील वंदना लोखंडे, बचेरीचे पोलीस पाटील अण्णासाहेब शिकारे, नानासाहेब मदने, विवेक काळे, श्रीकांत पाटोळे, उमेश देशमुख, माजी उपसरपंच रणजीत पाटील, प्रमोद भैस, सचिन पुकाळे, मंगेश वाघमारे तसेच विविध मंडळांचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी माळशिरस पोलीस ठाण्याचे हवालदार तुळशीराम गायकवाड यांनी सार्वजनिक णेशोत्सव मंडळांनी कशा पद्धतीने ऑनलाईन नोंदणी करून परवानगी घेणेविषयी सविस्तर माहिती दिली. यावेळी पोलीस दूरक्षेत्राचे हवालदार अभिजित कणसे, अमित जाधव, सतीश धुमाळ यांनी बैठकीचे नियोजन केले.

## अरण जि. प. शाळेत जुनी नाणी व नोटांचे प्रदर्शन

**सुराज्य/मोडनिंब** : मुख्य कार्यकारी अधिकारी स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यामध्ये सुरू असलेल्या शिक्षणाची दशसूत्री या उपक्रमांतर्गत आनंददायी पद्धतीने नावीन्यपूर्ण रचनात्मक शिक्षण देण्यासाठी जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा अरण येथे इ. पाचवीचे वर्गशिक्षक गोरख राऊत व जयश्री जाधव यांनी वर्गामध्ये जुनी नाणी व नोटा यांचे प्रदर्शन भरवले होते.

यामध्ये शिवजन्म पूर्वीची नाणी काही शिवमुद्रा तसेच इसवी सन १६१६ मधील अर्धा आणा, एक आणा, इसवी सन अठराशे अठरा मधील एक रुपया इथपासून ते २०२२ पर्यंतच्या सर्व नाणी व नोटा यांचा समावेश करण्यात आला होता. त्याचबरोबर एक पैसा, दोन पैसे, तीन पैसे, पाच पैसे, दहा पैसे, वीस पैसे, पंचवीस पैसे, पन्नास पैसे या सर्व नाण्यांचा समावेश होता. विशेष बाब म्हणजे परदेशी चलनांमधील डॉलर यांचाही समावेश या प्रदर्शनात करण्यात आलेला होता. नाण्यांबरोबरच सर्व नोटांचाही समावेश यामध्ये करण्यात आला होता. एक रुपयाच्या नोटांपासून पाचशे रुपयांच्या नोटांपर्यंत प्रदर्शन होते. मुलांना प्रत्यक्ष नाणी नोटा हाताळण्यास मिळाल्यामुळे खूश झाले. या प्रदर्शनास भेट देण्यासाठी शिक्षक भारतीचे राज्याध्यक्ष नवनाथ गेंड, अरण केंद्राचे केंद्रप्रमुख राजन सावंत, मुख्याध्यापिका वाघमोडे, बलभीम गोरे, नवनाथ शिंदे हे उपस्थित होते. जवळजवळ साडेचारशे विद्यार्थ्यांनी हे प्रदर्शन पाहिले. प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षकांनी सहकार्य केले.

# ग्रामपंचायतींनी चांगल्या कामांचा आदर्श निर्माण करावा : आ. देशमुख

**सुराज्य/दक्षिण सोलापूर**



**तालुक्यातील सरपंच, ग्रामसेवक व ग्रामपंचायतींनी उत्कृष्ट कामाबद्दल पुरस्कार प्राप्त केला आहे. त्यांनी व सर्व ग्रामपंचायतींनी आपल्या गावांची निकड, गावातील उपलब्ध स्तोत्र याचा विचार करून माझा वॉर्ड, गाव वैभवशाली बनावे, तालुक्यात व जिल्ह्यात गावाची वेगळी ओळख निर्माण व्हावी, अशा पद्धतीचे कामकाज करावे, असे आवाहन आमदार सुभाष देशमुख यांनी केले.**

**महाआवास अभियान २.० या उपक्रमात अंतर्गत उत्कृष्ट काम केलेल्या पंतप्रधान आवास योजना, रमाई घरकुल यामध्ये उत्कृष्ट काम केलेल्या ग्रामपंचायती, लाभार्थींच्या सन्मान सोहळ्याप्रसंगी यशवंतराव चव्हाण सभागृहात ते बोलत होते.**

ते पुढे म्हणाले, 'गावातील साक्षरतेचे प्रमाण, उच्च शिक्षणाचे प्रमाण, व्यापारी गाळे, शेती उत्पादने यातून आर्थिक चक्र समृद्ध बनावे. सर्व शासकीय योजनांचा बारकाईने अभ्यास करून गावासाठी कशा पद्धतीने फायदा करता येईल, याचा विचार ग्रामपंचायतींनी करणे आवश्यक आहे. ग्रामसेवकांनी रोजगार निर्मिती, शिक्षणात गावच्या विकासात अशा पद्धतीने काम करावे की ग्रामसेवकाची बदली होताना गावाने अश्रू ढाळावेत अशा पद्धतीचे कामकाज करणे अपेक्षित आहे. पंचायत समितीने या अनुषंगाने गावागावात स्पर्धा आयोजित करावी, असेही मार्गदर्शन त्यांनी पंचायत समितीला केले.

याप्रसंगी उपमुख्य कार्यकारी अधिकारी ईशादीन शेलकदे यांनी नाविन्यपूर्ण योजना राबवण्यासाठी ग्रामपंचायतीने प्रयत्न करावा. गावठाण क्षेत्रात जुन्या पडीक घरांऐवजी सार्वजनिक क्षेत्रासाठी उपयुक्त अशा मालमत्ता करता येईल का याचाही विचार ग्रामपंचायतींनी करावा असे मार्गदर्शन केले. उमेशचंद्र कुलकर्णी सहाय्यक प्रकल्प संचालक यांनी आवास योजनेअंतर्गत लवकरात लवकर कामकाज पूर्ण केल्यास ही योजना अतिशय फायदेशीर व समाधानकारक ठरणारी आहे, असे मार्गदर्शन याप्रसंगी केले.

याप्रसंगी निंबर्गी, मंद्रुप औराद माळकवठे, भंडारकवठे, बोरामणी, ग्रामपंचायत यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. धरेप्पा पिराजी मोरे निंबर्गी, महादेव मल्लप्पा, घोटाळे औराद, कल्लप्पा धरप्पा, रूपनुरे बंकलगी, भीमाशंकर रेवप्पा कांबळे मंद्रुप, कुंडलिक सुबराव, भडकुंबे गुंजेगाव, सिंधू अर्जुन कांबळे, भंडारकवठे या लाभार्थींना तर क्लस्टर पुरस्कार हतुर गण अमर दोडमनी विस्ताराधिकारी, भंडारकवठे गणातून बी. सी. पाटील विस्ताराधिकारी यांना प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह, रोप देऊन आमदार सुभाष देशमुख यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

प्रास्ताविक गटविकास अधिकारी बाळासाहेब वाघ यांनी केले. सूत्रसंचालन सहाय्यक प्रशासन अधिकारी विवेक लिंगराज तर आभार विस्ताराधिकारी पूनम नरसोडे यांनी केले. कार्यक्रमास निर्मला राठोड, विशाल मालतुमकर, इस्माईल मुलाणी, रोहन चव्हाण, कैलास जिंदे, भीमाशंकर वाले, बाळासाहेब म्हमाणे, अविनाश माने, बापूसाहेब भिसे आदींनी परिश्रम घेतले.




## आहार-उपासनेसाठी आदर्श जीवनशैली गरजेची : डॉ. भिशीकर

### स्नेहा शिनखेडे यांच्या दोन पुस्तकांचे प्रकाशन

**सुराज्य/सोलापूर**

**आधुनिक जीवनशैलीने रोजच्या जगण्यात अनेक प्रश्न निर्माण केले असून, आहार आणि उपासनेची जोड असलेली आदर्श जीवनशैली ही आजची गरज आहे, असे प्रतिपादन ज्ञानप्रबोधिनीच्या डॉ. स्वर्णलता भिशीकर यांनी केले.**

लेखिका आणि निरुपणकार स्नेहा शिनखेडे यांच्या 'आहार आणि उपासना' तसेच 'अमृताची अक्षरवेल' या दोन पुस्तकांचे प्रकाशन डॉ. भिशीकर यांच्या हस्ते झाले, त्यावेळी त्या बोलत होत्या. मुंबईचे विवेक प्रकाशन आणि सोलापूरचे सुविद्या यांनी ही पुस्तके प्रकाशित केली आहेत. हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या ॲम्पी थिएटरमध्ये झालेल्या या नेटक्या कार्यक्रमात डॉ. भिशीकर यांनी स्नेहा शिनखेडे यांच्या लेखणी आणि वाणीचे कौतुक केले.

आहाराला वैद्यकविज्ञान आणि उपासनेशी जोडून या उपेक्षित विषयाकडे लेखिकेने लक्ष वेधले आहे, असे त्या म्हणाल्या. स्नेहा शिनखेडे यांच्या व्यक्तिमत्त्वातील ऋजुता, त्यांची सात्त्विक वृत्ती आणि कविता-साहित्य-कला प्रेम अमृताची अक्षरवेल या पुस्तकात प्रतिबिंबित झाले आहे. त्या पुस्तकाच्या वाचनाने वाचक नक्कीच समृद्ध होतील, असे डॉ. भिशीकर यांनी सांगितले.

स्नेहा शिनखेडे यांनी मनोगतातून आपल्या लेखनप्रेरणा आणि लेखनप्रवास उलगडून सांगितला. सोलापूरकर रसिक, वाचक, श्रोते आणि स्नेही हे माझ्या काळजातील दिवे आहेत आणि वाचन-लेखन हा माझा श्वास आहे, असे त्या म्हणाल्या. त्यांच्या आकाशवाणीवरील लघुभाषणांचे आणि सा. विवेकमधील लेखनाचे संकलन या दोन्ही पुस्तकात करण्यात आले आहे. प्रारंभी सुनील शिनखेडे यांनी स्वागतपर प्रास्ताविक केले.

सुविद्या प्रकाशनाचे बाबूराव मैंदर्गीकर, चित्रकार शिरीष घाटे, आकाशवाणीचे राजेंद्र दासरी, जयश्री पुराणिक, लेखिका सुनेत्रा पंडित, माधव देशपांडे यांचा डॉ. भिशीकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे निवेदन माधव देशपांडे यांनी रसपूर्ण शैलीत केले.

या कार्यक्रमाला माजी खासदार धर्मण्णा सादूल, मसापचे दत्ताअण्णा सुरवसे, डॉ. भारत मुळे, ॲड. जे. जे. कुलकर्णी, ॲड. विजय मराठे, डॉ. श्रीकांत येळेगावकर, नितीन वैद्य, शुभांगी बुवा, शोभा मोरे यांच्यासह रसिक श्रोते बहुसंख्येने उपस्थित होते.

## जागेच्या कारणावरून हाणामारी; अकरा जणांवर गुन्हा दाखल

**सुराज्य/सोलापूर**

जागेच्या कारणावरून शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याप्रकरणी अकरा जणांविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना दि. २७ ऑगस्ट रोजी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास जोडभावी पेठ मंगळवार बाजार येथे घडली. याप्रकरणी तस्लीम अब्दुल करीम रामपुरे (वय-५०, रा. जोडभावी पेठ) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून मुस्ताक नजीर अहमद, अहमद हसन तांबोळी, जावेद जमादार, अर्शद बागवान (सर्व रा. शनिवार पेठ) व त्यांच्यासोबत सहा ते सात महिला असे मिळून अकरा जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

वरील संशयित आरोपींनी मुस्ताक अहमद व अहमद तांबोळी यांच्या नावे असलेली जागेची साफसफाई करण्यासाठी त्यांनी जेसीबी आणली व त्या जेसीबीद्वारे फिर्यादी राहत असलेल्या खोलीची भिंत पाडत असताना ते म्हणाले की, 'कोर्टाचा मनाई आदेश असताना तुम्ही खोली का पाडता.त्यावेळी वरील आरोपींनी तुला मला कोठे जायचे तेथे जावा असे म्हणून फिर्यादी यांना वरील संशयित चार आरोपींनी व त्यांच्यासोबत आलेले सहा ते

## अज्ञात वाहनाच्या धडकेत वृद्धाचा मृत्यू

**सुराज्य/सोलापूर**

अज्ञात वाहनाच्या धडकेत एका साठ वर्षाच्या अज्ञात इसमाचा मृत्यू झाल्याची घटना दि. २४ ऑगस्ट रोजी सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास हैदराबाद रोड समोरील जगदंबा हॉटेल येथे घडली.

याप्रकरणी पोलीस हेडकॉन्स्टेबल नंदराव महादेव गायकवाड यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. अज्ञात वाहनचालकाने त्याच्या ताब्यातील वाहन हे निष्काळजीपणाने व भरधाव




## माहेश्वरी व गायकवाड यांनी केले आफ्रिका खंडातील सर्वोच्च शिखर सर

**सुराज्य/सोलापूर**

सोलापूरमधील निखिल माहेश्वरी व लातूरमधील अजय गायकवाड या २ मराठी तरुणांनी स्वातंत्र्यदिनी आफ्रिकेतील सर्वोच्च शिखर माउंट किलीमांजारो सर करून सर्वांपुढे एक आदर्श निर्माण केला आहे.

७६व्या स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून एव्हरेस्टवीर आनंद बनसोडे यांच्या ३६० एक्सप्लोररद्वारे आफ्रिकेतील सर्वोच्च शिखराच्या मोहिमेत महाराष्ट्राच्या या सुपुत्रांनी इतिहास घडवत देशासाठी अभिमानास्पद कामगिरी करून मोहीम यशस्वी केली आहे.

१५ ऑगस्ट रोजी सकाळी ६.५० वाजता किलीमांजारो शिखरावर भारताचा तिरंगा फडकावून विश्वविक्रम केला आहे. ग्रामीण भागात राहणाऱ्या लातूरच्या अजय गायकवाड याने ७५ फुटांचा तिरंगा फडकवत विक्रम केला आहे, अशी माहिती ३६० एक्सप्लोररच्या संचालिका अक्षया बनसोडे यांनी दिली.

आफ्रिकेतील टांझानिया देशातील हे शिखर असून याची उंची समुद्र सपाटी पासून १९,३४१ फूट आहे. अतिशय खराब वातावरणात शून्याच्या खाली तापमान, गोंगावत वाहणारे वारे, उभी चढण, पडणारा बर्फ या सर्वांमधून अतिशय काळजीपूर्वक यांनी ही मोहीम पूर्ण केली आहे. या शिखराच्या चढाईसाठी त्यांनी १० ऑगस्ट रोजी सुरुवात केली होती. असा आगळावेगळा व देशाला अभिमानास्पद विक्रम केल्यामुळे सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे. ३६० एक्सप्लोरर या देशातील सर्वात प्रभावी साहसी मोहिमा आयोजित करणाऱ्या कंपनीसोबत ही मोहीम यशस्वी करून संपूर्ण देशापुढे त्यांनी आदर्श निर्माण केला आहे.

या पत्रकार परिषदेस निखिल माहेश्वरी व अजय गायकवाड, डॉ. स्मिता बुब, शैलेश बिर्ला, अमित कांबळे हे उपस्थित होते.

## 'देश मेरा' कार्यक्रम उत्साहात साजरा

**सुराज्य/सोलापूर**



येथील श्री सोलापूर गुजराती मित्र मंडळ संचलित युवा फोरम च्या रजत महोत्सव निमित्त व देशाच्या अमृत महोत्सवानिमित्त, युवा सदस्य पार्थ दावडा आणि कौशल रांभिया यांच्या मार्गदर्शनखाली आयोजित 'देश मेरा' हा कार्यक्रम गुजरात भवन येथे संपन्न झाला.

देशभक्तीवर आधारित या कार्यक्रमात बालगोपाल व युवकांनी विविध डान्स, कला कौशल्य सादर केले. या कार्यक्रमात भैरूरतन दमाणी अंधशाळेच्या विद्यार्थ्यांद्वारे सुंदर देशभक्तिपर गाणे सादर करून सर्वांचे मने जिंकून घेतले तसेच २५ वर्षात युवा फोरमचे सर्व माजी अध्यक्ष आणि माजी सचिवांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमादरम्यान समाज बांधवांना शहीद परिवारासाठी निधी मदत साह्य साठी योगदान देण्यासाठी आवाहन करण्यात आले. अवघ्या पंधरा मिनिटात ३० हजार गोळा झाले, ज्यामध्ये सोलापूर गुजराती मित्र मंडळ तर्फे, त्यात भर टाकून ३०००० ची देणगी वाढवून एकूण ६० हजार ची देणगी शहिदांच्या परिवारासाठी देण्याचे, गुजराती मित्रमंडळाचे अध्यक्ष मुकेश भाई मेहता व सचिव जयेशभाई पटेल यांच्याद्वारे जाहीर करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भोमिषा शहा, खुशबू उदेशी व मौसम रांभिया यांनी केले तर आभार प्रदर्शन, कौशल रांभिया यांनी केले. कांतिभाई पटेल यांनी भोजन व्यवस्था सांभाळली.

कार्यक्रमास अध्यक्ष धर्मेश राडिया व सचिव मयूर जगानी आणि युवा फोरमचे सभासद व महिला विभाग सदस्यांनी परिश्रम घेतले.

## स्टार्टर केबल, मोटर रातोरात होत आहेत लंपास

### आकुलगाव, चिंचगाव, तडवळे परिसरातील शेतकरी वैतागले

### भुरट्या चोरांवर पोलीस लगाम लावणार का?

**सुराज्य/कुर्डूवाडी**

**भोसरे, आकुलगाव, चिंचगाव, तडवळे या गावातील परिसरात शेतकऱ्यांच्या बोअर तसेच विहिरीच्या इंधन पंप चालू करण्याचे स्टार्टर व केबल रातोरात गायब होत आहेत. अनेक शेतकऱ्यांनी पहारा देऊन चोरटे पकडण्याची मोहीम राबवली तरीही चोरटे हातावर तुरी देत रात्रीत स्टार्टर व केबल चोरून नेण्यात यशस्वी होत आहेत.**

आकुलगाव, भोसरे, चिंचगाव, तडवळे परिसरात नेहमीच होत असलेल्या या चोऱ्यामुळे शेतकरी हैराण झाले आहेत. पोलिसांत तक्रार केली तरी तपास सुरू आहे याशिवाय कोणतेही उत्तर मिळत नाही त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी तक्रार दिली नसल्याचे सुराज्यला शेतकऱ्यांनी सांगितले. पोलीस प्रशासन अशा चोरट्यांना लगाम लावतील का असा ही सवाल शेतकरी विचारत आहेत.

भोसरे परिसरात सार्वजनिक विहिरीवरील देखील केबल चोरी गेली आहे. तर भोसरे येथील काळेवस्ती बागलवस्ती तेलीवस्ती बार्शी रोड परिसरात देखील अनेक विहिरीवरील स्टार्टर चोरी गेले आहेत.

> आजपर्यंत कधीच आमच्या विहिरीवरील स्टार्टर चोरी गेले नाहीत पण मागील दहा दिवसाखाली पेटीमधील स्टार्टर रात्रीत चोरीला गेला. मागे दोन वर्षापूर्वी देखील असाच चोरट्यांनी विहिरीतील मोटर चोरी केली होती. तेव्हा पोलिसात तक्रार केली पण यातून हाती काहीच लागले नाही.
>
> **- सचिन बागल, शेतकरी.**

#### स्टार्टर व केबल चोरीचे रॅकेटच असू शकते

सातत्याने शेतीमधील या साहित्यांचे उपकरणांची चोरी होत आहे. भोसरे आकुलगाव चिंचगाव तडवळे परिसराला चोरट्यांनी रातोरात धुतले आहे. सिना नदी काट देखील केबल स्टार्टर मोटार या साहित्यांची रात्रीत लंपास होत आहे.

> आजपर्यंत कधीच आमच्या विहिरीवरील स्टार्टर चोरी गेले नाहीत पण मागील दहा दिवसाखाली पेटीमधील स्टार्टर रात्रीत चोरीला गेला. मागे दोन वर्षापूर्वी देखील असाच चोरट्यांनी विहिरीतील मोटर चोरी केली होती. तेव्हा पोलिसात तक्रार केली पण यातून हाती काहीच लागले नाही.
>
> **- सचिन बागल, शेतकरी.**

शेतकऱ्यांनी तक्रारी करायच्या तरी किती? या उपकरणांची होत असलेली चोरी ही मोठे रॅकेट असू शकते असा अंदाज स्थानिक शेतकरी वर्तवीत आहेत.

एखाद्या शेतकऱ्याच्या विहिरीतील मोटर केबल व स्टार्टर चोरी गेल्यास चोरट्याला एका चोरीमागे मोटर दहा ते बार हजार केबल पाच ते सात हजार, स्टार्टरची किंमत दीड ते अडीच हजार आहे.

> गेल्या दहा दिवसात आमच्या काळे वस्ती परिसरात चार स्टार्टर व बोअरमधील दोनशे फूट केबल चोरी गेली. आम्हांला या भुरट्या चोऱ्यामुळे पंधरा दिवसाला नवीन उपकरणे टाकावी लागत आहेत. सदर चोऱ्यांची जिल्हा पोलीस अधीक्षकांनी दखल घेत याची चौकशी करावी.
>
> **- सतीश काळे, भोसरे.**

अशी एकूण वीस ते पंचवीस हजार रुपयांची चोरी एका शेतकऱ्याची होती. चोरट्यांना ही दिवाळी आहे तर शेतकऱ्यांचा मात्र शिमगा आहे.



## वेळापूर येथे मोफत मोतीबिंदू निदान शिबीरामध्ये ७६ जणांची तपासणी

**सुराज्य/वेळापूर** : वेळापूर (ता. माळशिरस) येथे अमोल पनासे मित्र मंडळाच्या वतीने मोफत मोतीबिंदू निदान शिबिराचे आयोजन वेळापूर पालखी चौक श्रीकृष्ण पतसंस्था येथे करण्यात आले होते. मोतीबिंदू निदान शिबिरा मध्ये सेवासदन लाईफ लाईन हॉस्पिटल मिरज यांच्या वतीने मोफत मोतीबिंदू तपासणी शिबीर घेण्यात आले. यामध्ये ७६ लोकांची नेत्र तपासणी करण्यात आली. यामध्ये १५ जणांची स्वखर्चाने शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. या शिबिराला राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्ह्याचे नेते उत्तमराव जानकर, जि प सदस्य बाळासाहेब धाईंजे, मार्केट कमिटीचे माजी संचालक दादासाहेब घाडगे, राष्ट्रवादीचे नेते संदीप तात्या माने देशमुख संजय देशपांडे, वेळापूर उपसरपंच जावेद मुलानी सामाजिक न्याय विभाग तालुकाध्यक्ष रजनीश बनसोडे, जवान माने देशमुख, दिपक माने देशमुख, डॉ. धनंजय मेहत्रे, गणेश साठे, हणमंत वायदंडे, रघुनाथ गोलारे, नागेश क्षिरसागर, विनायक माने, धनंजय शिवपुजे यासह आनेक मान्यवरांनी शिबीराला भेट दिली. तसेच मोफत बिंदू निदान शिबिर पार पाडण्यासाठी अमोल पनासे मित्र मंडळ सर्व कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले.

## पिलीव येथे शेळ्या चोरीचे सत्र सुरुच; भिसन यांच्या शेळ्यांची चोरी

**सुराज्य/पिलीव** : माळशिरस तालुक्यातील पिलीव परीसरात गेल्या काही दिवसांपासून शेळ्यांच्या मोठ्या प्रमाणावर चोऱ्या होत आहेत. मात्र काही केल्या चोऱ्या बंद होईनात शुक्रवारी रात्रीच्यावेळी पिलीव येथील पंजाब नामदेव भिसन यांच्या घरासमोरुन रात्रीच्यावेळी ३५ किलोच्या आसणारा जातींवंत बोकड अंदाजे पन्नास हजार रुपये किमतीचा व एक शेळी अंदाजे तिस हजार रूपये किमतीची चोरांनी नेली यामुळे. पिलीव परीसरातील आतापर्यंत जवळपास २६ शेळ्यांच्या चोऱ्या झाल्या आहेत मात्र चोरट्यांचा काही केल्या सुगावा लागेना. सर्व शेतकऱ्यांनी पिलीव पोलीस ठाण्यात सदर शेळया चोरींच्या तक्रारी दाखल केल्या आहेत पण पोलिस प्रशासनाने यासाठी कोणत्याही प्रकारचा छडा लावला नाही. यामुळे शेतकऱ्यांनमधुन नाराजी व्यक्त होत आहे. पोलिस यासाठी विशेष ऑपरेशन राबवुन शेळया चोरांच्या मुसक्या आवळल्या पाहीजेत अशी मागणी शेतकरी बांधवानमधुन होत आहे. यामुळे सध्या पिलीव परीसरातील शेतकऱ्यांनमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे.

## श्री शारदेय गुरुकुलमध्ये श्लोक पठण स्पर्धा

**सुराज्य/टेंभुर्णी** : श्री लक्ष्मणराव देशमुख बहुउद्देशीय सार्वजनिक संस्था संचलित श्री शारदेय गुरुकुल पब्लिक स्कूल टेंभुर्णी मध्ये शनिवार दि. २७ ऑगस्ट रोजी श्लोक पठण स्पर्धे चे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या आधुनिक प्रगती बरोबर आध्यात्मिक प्रगती साधणे हा या स्पर्धा घेण्या श्रपाठीमागचा मुख्य हेतू होता. सध्याची मोबईल पिढी आणि लोप होत चाललेली अध्यात्मिक संस्कृती, यांचं पुनर्जीवन करण्यासाठी प्रशालेने हा एक छोटासा प्रयत्न केला आणि याला भरघोस अशा प्रकारचा प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेच्या उपाध्यक्षा लता बाळासाहेब देशमुख (काकी) व कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रतीक्षा प्रशांत कवडे मॅडम या हजर होत्या तसेच कार्यक्रमाला आणखी एक प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले भक्ती संप्रदायातील व्यक्ती श्री गणेश रामचंद्र कांबळे सर हेही कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते. कार्यक्रमांमध्ये प्रमुख पाहुण्यांच्या सत्कारानंतर विद्यार्थ्यांनी घेतलेल्या विविध श्लोकांचेअर्थपूर्णरित्या वाचन / प्रकटीकरण करण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांनी श्लोकाचे असणारे अर्थ व दैनंदिन जीवनाशी असणारा संबंध जोडून आपापल्या श्लोकांविषयीचे असणारे मत स्पष्ट केले. या स्पर्धा इयत्ता पहिली ते नववीच्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आल्या असल्या तरीही पूर्व प्राथमिक गटांच्या विद्यार्थ्यांनी देखील आपल्याला माहिती असलेले श्लोक प्रस्तुत्त करुन सर्वांची माने जिंकली. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाणी यांनी केले. गणेश रामचंद्र कांबळे व स्कुलच्या प्रिंसिपल शाहिदा पठान यांनी स्पर्धे चे परीक्षक म्हणून काम पाहिले. याच दिवशी पूर्व प्राथमिक म्हणजे के. जी. विभागा तर्फे रेड डे साजरा करण्यात आला, तसेच हाऊस वाईज क्रिकेट मॅच ही घेण्यात आल्या.

## 'शिवप्रताप - गरुडझेप' लवकरच रूपेरी पडद्यावर

**सुराज्य/सोलापूर** : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांची रणनीती आज संपूर्ण जगभर अभ्यासली जात आहे. महाराजांनी कशाप्रकारे शून्यातून स्वराज्य निर्मिती करत रयतेच्या राज्याची स्थापना केली याचे धडे जगभरातील सैनिकांना दिले जातात. इतिहासाच्या सुवर्णपानांमध्ये दडलेला हाच प्रेरणादायी अध्याय आता 'शिवप्रताप - गरुडझेप' या आगामी भव्य मराठी चित्रपटात पहायला मिळणार आहे. ५ ऑक्टोबर २०२२ या विजयादशमीच्या मुहूर्तावर 'शिवप्रताप-गरुडझेप' रसिकांच्या भेटीला येणार आहे. डॉ. अमोल रामसिंग कोल्हे, विलास सावंत, सोनाली घनश्याम राव, चंद्रशेखर ढवळीकर, कार्तिक राजाराम केंढे यांची निर्मिती असलेल्या 'शिवप्रताप - गरुडझेप' या चित्रपटाचं दिग्दर्शन कार्तिक केंढे यांनी केलं आहे.

## महिलांचे सामुदायिक श्रीगणेश अथर्वशीर्ष पठण

**सुराज्य/अक्कलकोट** : श्री गणेशोत्सवाचे औचित्य साधून श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ व न्यासाची सहयोगी संस्था असलेल्या हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांचे सामुदायिक श्रीगणेश अथर्वशीर्ष पठणाचा कार्यक्रम मंडळ परिसरातील श्री शमीविघ्नेश् गणेश मंदिर येथे भगिनींचे मंगळवार, दि. ६ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजता आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्षा अलकाताई जन्मेजयराजे भोसले यांनी दिली आहेत. नावे नोंदविलेल्या भगिनींना अथर्वशीर्ष पोथी मंडळाकडून देण्यात येणार आहे. तरी इच्छुक भगिनींनी आपली नावे अप्पू पुजारी ९८२२१६९५९१ (अन्नछत्र मंडळ मुख्य पुरोहित), श्रीमती रत्नमाला मचाले ९८८१३८८८७६ / ८०१०५२४३७३, स्मिता कदम ७६२०८५७६४१, सुवर्णा घाटगे ८४०८०७१३५० या संपर्क क्रमांकावरती संपर्क करून नोंदवावीत असे आवाहन संस्थेच्यावतीने करण्यात आले आहे.

# 'जे आदिवासींना ते धनगर समाजाला'

## अनुसूचित जमातीच्या २२ योजना लागू

## सामाजिक प्रगतीचा मार्ग मोकळा

**सुराज्य/सोलापूर**

राज्यात घडलेल्या घडामोडी नंतर शिंदे-फडणवीस सरकार सत्तेत आले. त्यानंतर समाजातील सामाजिक कार्यकर्ते व विशेष करून आ. गोपिचंद पडळकर यांनी 'जे आदिवासींना ते धनगर समाजाला' यासाठी २२ योजना पुन्हा कार्यान्वित कराव्या यासाठी सभागृहात पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाले असून राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी धनगर समाजाच्या २२ योजना लागू केल्या असल्याने समाजाचा सामाजिक प्रगतीचा मार्ग मोकळा झाला आहे.

२०१९ मध्ये तत्कालीन सरकारने जो पर्यंत धनगर समाजाचा एसटी आरक्षणाचा प्रश्न सुटत नाही तो पर्यंत जे आदिवासींना ते धनगर समाजाला या तत्वावर समाजाला न्याय देण्याच्या भुमिकेतून अनुसूचित जमाती (एसटी) साठी लागू असलेल्या २२ योजनाचा लाभ देण्याचे ठरविले होते. त्यामुळे धनगर समाजाला मोठा आधार मिळाला होता. परंतु २०१९ च्या विधानसभा निकालानंतर राज्यात सत्तेवर आलेल्या महाविकास आघाडी सरकारने या २२ योजने बाबतीत निधी न देता नकारात्मक भुमिका घेतली होती. त्यामुळे या योजनांच्या माध्यमातून समाजाच्या सामाजिक प्रगतीसाठी पाठबळ मिळत नव्हते. आता सत्ताधारी असणाऱ्या सरकारने या योजना पुन्हा लागू केल्याने समाजात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



> २०१९ मध्ये तत्कालीन सरकारने लागू केलेल्या २२ योजना आता पुन्हा उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या माध्यमातून लागू करण्यात आल्या आहेत. समाजाच्या सक्षमीकरणासाठी विविध योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे आदेश इतर मागास बहुजन कल्याण संचालनालयाने जिल्हाधिकारी आणि संबंधित खात्याच्या आयुक्त, उपायुक्तांना दिले आहे. गेल्या अडीच वर्षामधील अनुशेष भरून काढण्यासाठी राज्यातील सर्व जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी या योजना तळागाळातील शेवटच्या माणसा पर्यंत पोहचविण्यासाठी मेहनत घेतली पाहिजे.
>
> – **आ. गोपिचंद पडळकर,** सदस्य विधान परिषद

### आदिवासीच्या धर्तीवर धनगर समाजासाठी विविध योजना

* भटक्या जमाती-क या प्रवर्गातील भूमीहिन मेंढपाळ कुटुंबांसाठी अर्धबंदिस्त, बंदिस्त, मेंढीपालनासाठी जागा उपलब्ध करुन देणे किंवा जागा खरेदीसाठी अनुदान तत्वावर अर्थसहाय्य देणे. * वसतिगृह योजनेपासून वंचित असलेल्या भटक्या जमाती-क या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना आदिवासी विकास विभागाच्या स्वयंम योजनेच्या धर्तीवर स्वतंत्र योजना कार्यान्वित करणे. * भटक्या जमाती-क या प्रवर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांना नामांकित इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये प्रवेश देणे. * भटक्या जमाती-क या प्रवर्गातील ग्रामीण भागातील बेघर कुटुंबांना पहिल्या टप्प्यात १०, ००० घरकुले बांधून देणे. * भटक्या जमाती-क या प्रवर्गातील आवश्यक असलेल्या परंतु अर्थसंकल्पित निधी उपलब्ध नसलेल्या योजना/कार्यक्रम राबवण्यासाठी न्युक्लिअस बजेट योजना. * राज्यातील भटक्या जमाती-क या प्रवर्गातील व्यक्ती सदस्य असलेल्या सहकारी सूत गिरण्यांना भागभांडवल मंजूर करणे. * केंद्र शासनाच्या स्टँड अप इंडिया' योजनेत भटक्या जमाती-क या प्रवर्गातील नवउद्योजकांना सहाय्य करण्यासाठी मार्जिन मनी' उपलब्ध करुन देणे. * भटक्या जमाती-क या प्रवर्गातील मेंढपाळ कुटुंबांना पावसाळ्यात चराईकरिता जून ते सप्टेंबर या ४ महिन्यांसाठी चराई अनुदान देणे. (प्रायोगिक तत्वावर) * भटक्या जमाती-क या प्रवर्गातील होतकरु बेरोजगार पदवीधर युवक-युवतींना स्पर्धा परिक्षेसाठी परीक्षापूर्व निवासी प्रशिक्षण. * भटक्या जमाती-क या प्रवर्गातील बेरोजगार युवक-युवतींना स्पर्धा परिक्षेसाठी परिक्षा शुल्कात आर्थिक सवलती लागू करणे. * भटक्या जमाती-क या प्रवर्गातील बेरोजगार युवक युवतींना लष्करातील सैनिक भरती व राज्यातील पोलीस भरतीसाठी आवश्यक ते मूलभूत प्रशिक्षण देणे. * ग्रामीण परिसरातील कुक्कुटपालन संकल्पनेंतर्गत भटक्या जमाती (क) या प्रवर्गातील जमातीसाठी ७५ टक्के अनुदानावर ४ आठवडे वयाच्या सुधारित देशी (सीएआरआय- मान्यता प्राप्त) प्रजातीच्या १०० कुक्कुट पक्ष्यांच्या खरेदी आणि संगोपनासाठी अर्थसहाय्य. * नवी मुंबई, पुणे, औरंगाबाद, नाशिक, नागपूर आणि अमरावती या महसूली विभागांच्या मुख्यालयाच्या ठिकाणी भटक्या जमाती-क प्रवर्गातील मेट्रिकोत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह निर्माण करणे.

## श्री श्री सदगुरु कारखान्याचे सोमवारी बॉयलर प्रतिपन

**सुराज्य/पिलीव** : सातारा-सांगली-सोलापुर जिल्ह्यांच्या सरहद्दीवर असणाऱ्या राजेवाडी येथील श्री श्री सदगुरु साखर कारखान्याचा अकराव्या गळीत हंगामाचा सन २०२२-२३ चा अग्नी प्रदीपन सोहळा २९ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजुन १५ मिनीटांनी कारखान्याचे चेअरमन तथा कार्यकारी संचालक एन शेषागिरीराव यांच्या शुभहस्ते संपन्न होणार आहे. तसेच सदर कार्यक्रमास कारखान्याचे सर्व संचालक, अधिकारी, कर्मचारी, वाहनमालक सभासद बंधू उपस्थित राहणार आहेत. तरी यावेळी शेतकरी, सभासद बांधव, हितचिंतक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहवे असे आवाहन कारखान्याचे चेअरमन एन शेषागिरीराव यांनी केले आहे.


## वेळापूर येथे ३० ऑगस्ट रोजी दहीहंडी महोत्सव

### सिनेतारका पवार, आ. लंके यांची उपस्थिती

**सुराज्य/वेळापूर**

वेळापूर तालुका माळशिरस पालखी मैदान येथे ३० ऑगस्ट २०२२ रोजी सायंकाळी ६. ०० वाजता दहींहडी महोत्सवाचे आयोजन उत्तमराव जानकर युथ फाऊंडेशन, बाळासाहेब धाईंजे युवा मंच, सूर्या ग्रुप वेळापूर यांच्या वतीने दहींहडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या दहींहडी महोत्सवाला

सिने कलाकार ऋतिका गायकवाड, रोहन पाटील मला आमदार झाल्या





सारख वाटतय तसेच करमाळा आमदार संजयमामा शिंदे, पुणे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्ष प्रदीप गारडकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते उमेश पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश सदस्य वसंतराव पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्ह्याचे नेते उत्तमराव जानकर, फत्तेसिंह माने पाटील, माजी पं. स. सदस्य पांडुरंगभाऊ माने देशमुख, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. धवलसिंह मोहिते पाटील, डॉ. रामदास देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हा उपाध्यक्ष धैर्यशील देशमुख, माजी सभापती मच्छिंद्र आबा ठवरे, रणजीतसिंह जाधव, जि. प. सदस्य बाळासाहेब धाईंजे, शरदबापू मोरे, राष्ट्रवादी काँग्रेस माळशिरस तालुका अध्यक्ष माणिकबापू वाघमोडे, राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभाग जिल्हाध्यक्ष डॉ. धनंजय साठे, राष्ट्रवादी काँग्रेस युवक तालुका अध्यक्ष बाबासाहेब माने, पं. स. सदस्य अजय सकट, सामाजिक न्याय विभाग तालुकाध्यक्ष रजनीश बनसोडे, वेळापूर उपसरपंच जावेद मुलाणी यांच्यासह माळशिरस तालुक्यातून मान्यवर आणि वेळापूर ग्रामस्थ, दहीहांडी प्रेमी उपस्थित राहणार आहेत.

## प्लॉटची खरेदी न देता फसवणूक ; एकावर गुन्हा

**सुराज्य/सोलापूर** : प्लॉटची खरेदी न देता व विश्वास संपादन करून फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी अंबुबाबाई भीमाशंकर तुप्पद (वय-५२, रा. भारत माता नगर, होडगी रोड) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून दत्तात्रय महादेव ताकमोगे (रा. ताकमोगे वस्ती) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

संशयित आरोपी दत्तात्रय ताकमोगे यांनी शंभर रुपयांच्या बॉण्ड पेपरवर कब्जा पावती व करारनामा करून सोलापूर महानगरपालिकेच्या नवीन हद्दीतील मौजे माजरेवाडी येथील जुना सर्वे नंबर २७६/अ १, व नवीन सर्वे नंबर १/१ अ या क्षेत्रातील फिर्यादी यांच्या नावे असलेला एक हजार स्केअर फुटचा प्लॉट आहे. तसेच फिर्यादी यांचा भाऊ तिप्पण्णा संगप्पा सिद्रामशेट्टी यांच्या नावावर असलेले दोन प्लॉट असे एकूण तीन प्लॉटचा लेआउट व खरेदी करून देतो असे म्हणून प्लॉटची एकूण १२ लाख ४ हजार रुपये तसेच रस्ता काढून देतो म्हणून २० हजार रुपये घेऊन फिर्यादीचा विश्वास संपादन करून प्लॉट खरेदी न देता फिर्यादी यांची फसवणूक केली आहे. असे फिर्यादीत नमूद आहे. घटनेचा पुढील तपासायक पोलीस निरीक्षक देशमुख हे करीत आहेत.

## कुर्डुवाडी जनता बँकेकडून ९ टक्के लाभांश

**सुराज्य/कुर्डूवाडी**

जनता सहकारी बँक लिमिटेड कुर्डुवाडी या संस्थेची ४४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा मोठ्या उत्साहात खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. या सभेत सभासदांना ९ टक्के लाभांश बँकेचे अध्यक्ष तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष अर्जुनराव बागल यांनी जाहीर केला.

येथील कै विठ्ठलराव शिंदे सभागृहात झालेल्या सभेत व्यासपीठावर संचालक माजी अध्यक्ष सुरेश शहा, फुलचंद धोका, अशोक खाडे, जगन्नाथ क्षीरसागर, किरण दोशी, सुलभा दिंडे, दिलीप तळेकर, विक्रम बोराडे आदी संचालक उपस्थित होते. सहा. व्यवस्थापक विजय गायकवाड यांनी केलेल्या अहवाल वाचनात स्थापनेपासून कायम 'अ' वर्ग मिळवणाऱ्या या संस्थेचे चालू वर्षातील भागभांडवल २कोटी २२लाख ३२हजार




९७५ एवढे आहे. बचत ठेवी १० कोटी ५७ लाख ९२ हजार ३७३ चालू ठेवी १ कोटी १२ लाख ११ हजार ८४६, मुदत ठेवी ४४ कोटी १५ लाख ८८ हजार ८०६. असे एकूण ५५ कोटी ८५ लाख ९३ हजार ०२६ इतक्या ठेवी आहेत. एकूण कर्जे २९ कोटी ८९ लाख ०९ हजार ७४५ यावर्षी ३१ मार्च २०२२ अखेर बँकेला ५८ लाख ०७ हजार ६०८ रुपये नफा झाला आहे. बँकेचे खेळते भांडवल ६७ कोटी २४ लाख २१ हजार ३५० रुपयव इतके आहे.

यावेळी साहित्यिक राजेंद्र दास, विजयसिंह परबत, दत्ताजी गवळी, राजेश गांधी, सतीश चोपडे, सुधीर मराळ, विजय कन्हेरे, अजित पुर्वत, विशाल बागल, मस्जिद बागवान, संजय टोणपे, विठ्ठल तांबट, बाळासाहेब गोसावी, अप्पा सरडे, प्रकाश बागल समीर तरटे आदी सभासद यावेळी उपस्थित होते.

सभा यशस्वी करण्याकरिता शाखाधिकारी सुहास मराळ, धनंजय चव्हाण, दत्तात्रय शिंदे, राहूल डिकोळे, स्वप्नील भोसले, धीरज चव्हाण, पांडू लोंढे, सुनीता साळुंखे यांनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक सुरेश शहा सूत्रसंचालन सत्यवान जगदाळे, यांनी तर आभार जगन्नाथ क्षीरसागर यांनी मानले.

> कोरोनाच्या काळात सुध्दा रिझर्व्ह बँकेने घालून दिलेल्या निकषाच्या मर्यादेत बँकेचा नेट एन.पी.ए.चे प्रमाण १.०५ टक्के यावर्षी एन पी ए. १.०४ इतका आहे.

## अन्यथा टाळा ठोको आंदोलन : काळे

**सुराज्य/मोहोळ** : कोट्यावधी रुपयांचा निधी खर्च करूनही मुख्य रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे करणाऱ्या ठेकेदारावर गुन्हा दाखल न करणाऱ्या मोहोळ नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करावा अन्यथा २ सप्टेंबर रोजी मोहोळ नगर परिषदेस टाळा ठोको आंदोलन करण्याचा इशारा क्रांतिवीर भगतसिंग युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष दशरथ काळे यांनी सोलापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे दिला आहे.

मोहोळ शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते आठवडा बाजार या दरम्यान मुख्य रस्ता आहे नगर परिषदेची स्थापना झाल्यापासून कोट्यावधी रुपयांचा निधी खर्च करण्यात आला आहे. मात्र त्यावर वारंवार खड्डे पडत आहेत हा रस्ता नीटपणे दुरुस्त करावा आणि याचे काम निकृष्ट दर्जाचे करणाऱ्या बारामतीचे ठेकेदार योगेश हिंगणे यांच्यावरती कारवाई करावी या मागणीसाठी दशरथ काळे यांनी स्वातंत्र्यदिनी आंदोलन केले होते.

## बळीराजासाठी कृषी, महसूल अन् ग्रामविकास बांधावर

### 'माझा एक दिवस माझ्या बळीराजासाठी' १ ते ३० सप्टेंबर राज्यभर उपक्रम

**सुराज्य/सोलापूर**

राज्यातील शेतकऱ्यांमध्ये नैराश्य का येते ?, ते आत्महत्या का करतात?, त्यांच्या अडचणी नेमक्या काय आहेत? हे समजावून घेण्यासाठी माझा एक दिवस माझ्या बळीराजासाठी' उपक्रमात कृषी खात्याबरोबरच महसूल, ग्रामविकास अधिकाऱ्यांचाही समावेश असेल. त्यांनी प्रत्येक गावात ग्राम कृषी विकास समितीची बैठक घ्यावी, असे आदेश देण्यात आले आहेत.

राज्यात १ सप्टेंबर ते ३० नोव्हेंबर या कालावधीत हा उपक्रम राबविला जाईल. कृषी खात्यातील अधिकाऱ्यांनी राज्य सरकारच्या या उपक्रमाचे स्वागत केले आहे. वास्तविक कृषीपेक्षा शेतकऱ्यांना जास्त अडचणी महसूल व ग्रामविकास विभागाच्या यंत्रणेकडून येतात. त्याकडे सतत दुर्लक्ष होत असते. शेतकऱ्यांचे कोणतेही प्रश्न चर्चेला आले की केवळ कृषी खात्याकडे बोट दाखविले जाते. या उपक्रमात महसूल व ग्रामविकास अधिकाऱ्यांनाही सामावून घेतले आहे. त्यामुळे या अधिकाऱ्यांना आता शेतकऱ्यांच्या बांधावर जावे लागेल. शेतकऱ्यांशी संबंधित कामांमधील चुका सुधारण्याची संधी या निमित्ताने दोन्ही खात्यांमधील अधिकाऱ्यांना मिळते आहे, अशी माहिती एका कृषी सहसंचालकाने दिली.

### अधिकारी नेमके काय करणार?

* गावातील बँका, विविध कार्यकारी तसेच दूध सोसायट्यांना भेटी देणार * शेतकऱ्यांच्या सर्व अडचणी, त्यांचे उत्पादन, खर्च याची माहिती घेणार * नैराश्य येण्याची कारणे शोधणार आणि त्यासाठी कोणत्या उपाययोजना कराव्यात, याचा अहवाल देणार * प्रत्येक गावात ग्राम कृषी विकास समितीची बैठक होणार * शासनाच्या विविध योजनांची माहिती व त्यातील अडचणी जाणून घेणार * प्रयोगशील शेतकऱ्यांच्या बांधावर भेटी देणार. * शेतकऱ्यांचे अर्थकारण व त्यातील अडचणी समजावून घेणार * सर्व शेतकरी उत्पादक कंपन्या, बचत गट, महिला गटाच्या उपक्रमांना भेटणार

प्रशासनातील सर्व वरिष्ठ अधिकारी, विद्यापीठांचे शास्त्रज्ञ यांनी एक संपूर्ण दिवस शेतकऱ्यासोबत राहावे आणि त्यांच्या सर्व दैनंदिन जीवनातील अडचणींचा अभ्यास करावा. आमदार, खासदार व इतर लोकप्रतिनिधींना इच्छा असल्यास या उपक्रमात सहभागी करून घ्यावे, अशा सूचना राज्य शासनाने दिल्या आहेत.

या उपक्रमांतर्गत आता कृषी खात्याचे प्रधान सचिव एकनाथ डवले, कृषी आयुक्त धीरज कुमार यांच्यासह सर्व संचालक, सहसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, आत्मा'चे प्रकल्प संचालक व उपसंचालक, कृषी विकास अधिकारी, कृषी उपसंचालक विविध गावांमध्ये जातील. या शिवाय कृषी विद्यापीठांचे कुलगुरू, विभाग प्रमुख, कृषी महाविद्यालयांचे अधिष्ठातादेखील बांधावर जातील आता सर्व महसूल आयुक्त, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रांताधिकारी, तहसीलदार यांनाही शासनाच्या आदेशानुसार एक दिवस आपली कार्यालये सोडावी लागतील. कृषी अधिकाऱ्यांना महिन्यातून तीन दिवस, तर महसूल, ग्रामविकास व इतर विभागाच्या अधिकाऱ्यांना किमान एक दिवस गावांमध्ये जावे लागेल, असे कृषी विभागाच्या सूत्रांनी स्पष्ट केले.

# क्षणात 'नोएडा' ची 'ट्विन टॉवर' जमीनदोस्त

## गुंतवणूक किती? सध्याची किंमत काय होती? पाडायला किती खर्च?

सुराज्य/नोएडा

**नोएडातील अनधिकृतपणे बांधण्यात आलेले महाकाय ट्विन टॉवर्स अवघ्या १० सेकंदांमध्ये जमीनदोस्त करण्यात आले आहेत. ९ वर्षांच्या प्रदीर्घ न्यायालयीन लढाईनंतर 'एपेक्स' आणि सेयान' हे 'सुपरटेक' कंपनीच्या मालकीचे महाकाय टॉवर्स पाडण्यात आले आहेत. 'एपेक्स' ही इमारत ३२ मजली तर सेयान' २९ मजल्यांची इमारत होती. या इमारती जमीनदोस्त करण्यात आल्यानंतर लगतच्या परिसरामध्ये धुळीचं साम्राज्य निर्माण झालं आहे. तब्बल ३ हजार ७०० किलो स्फोटकांचा वापर करून हे ट्विन टॉवर्स पाडण्यात आले आहेत. या पाडकामासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला. या पाडकामादरम्यान नोएडा परिसरात ५६० पोलीस, १०० राखीव दलाचे जवान आणि चार एनडीआरएफच्या टीम तैनात करण्यात आल्या होत्या.**



नोएडातील सेक्टर ९३ मधील 'द एमराल्ड कोर्ट गृहनिर्माण' प्रकल्पातील या टॉवर्समध्ये ८५० फ्लॅट्स होते. नोएडा-ग्रेटर नोएडा एक्स्प्रेसवे लगत बांधण्यात आलेल्या या टॉवर्सची उंची १०० मीटर लांब म्हणजेच कुतुब मिनारापेक्षाची जास्त होती.

या टॉवर्सचं पाडकाम हाती घेण्याआधी लगतच्या इमारतींमधील रहिवाशांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले होते. टॉवर परिसराचा जवळपास ५०० मीटरचा भाग सील करण्यात आला होता.

### ट्विन टॉवर्सचं बाजारमूल्य किती?

दोन्ही टॉवरमध्ये एकूण ९५० फ्लॅट्स होते. सुपरटेकनं २०० ते ३०० कोटी रुपये खर्चून ट्विन टॉवरची उभारणी केली होती. ज्या ठिकाणी ट्विन टॉवरचं बांधकाम झालं, त्या भागात मालमत्तेचा दर सध्या १० हजार रुपये प्रति वर्ग फूट इतका आहे.

हा आकडा विचारात घेतल्यास ट्विन टॉवर्सचं मूल्य १००० कोटी रुपयांच्या पुढे जातं. मात्र कायद्याच्या कचाट्यात सापडल्यानं दोन्ही टॉवरच्या मूल्यावर परिणाम झाला आणि ते ७०० ते ८०० कोटींपर्यंत आलं.

### किती जणांनी फ्लॅट बुक केले होते?

ट्विन टॉवरमध्ये ७११ ग्राहकांनी फ्लॅट बुक केले होते. यापैकी ६५२ ग्राहकांसोबत सुपरटेकनं सेटलमेंट केली. बुकिंगवेळी दिलेली रक्कम आणि व्याज असा पर्याय देण्यात आला होता. बाजारमूल्य किंवा बुकिंगवेळचा दर अधिक व्याज मिळून त्या इतक्यात दराचा दुसरा फ्लॅट असाही पर्याय दिला गेला.

काही जणांनी ट्विन टॉवरमधील फ्लॅटच्या बदल्यात स्वस्तातली प्रॉपर्टी घेतली. अशा फ्लॅट मालकांना अद्याप उर्वरित रक्कम मिळालेली नाही. ट्विन टॉवर्सच्या ५९ ग्राहकांना अद्यापही मोबदला मिळालेला नाही. मोबदला देण्याची मुदत ३१ मार्च २०२२ होती.

### लोखंड, बांधकामासाठी वापरल्या जाणाऱ्या काचेचा पुनर्वापर -

कोणत्याही प्रकल्पात चार प्रमुख बांधकाम साहित्याचा वापर केलेला असतो, ज्यामध्ये लोखंड, काच, काँक्रीट आणि फरशीचा समावेश आहे. जेव्हा ती इमारत कोसळते तेव्हा तिच्या मलब्यातील जवळपास सर्वच लोखंडाचा पुन्हा वापर केला जातो. बांधकामासाठी वापरली जाणारी काच देखील एक अत्यंत लवचिक आणि पुनर्वापर करण्यायोग्य सामग्री आहे.

## हे तर आधीच्या सरकारमधील भ्रष्टाचाराचे प्रतिक



नोएडातील ट्विन टॉवर्स आधीच्या सरकारमधील भ्रष्टाचाराचे प्रतिक आहे, अशी टीका उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर ३२ मजली 'एपेक्स' आणि २९ मजली 'सेयान' हे दोन टॉवर्स रविवारी दुपारी अडीचच्या सुमारास पाडण्यात येणार आहेत. नोएडातील सेक्टर ९३ मधील 'एमराल्ड कोर्ट गृहनिर्माण' प्रकल्पातील या टॉवर्समध्ये ८५० फ्लॅट्स आहेत. या टॉवर्सची उंची १०० मीटर लांब म्हणजेच कुतुबमिनारापेक्षाची जास्त आहे.

'एडिफाय इंजिनीअरिंग'ला हे ट्विन टॉवर्स पाडण्याचे काम देण्यात आले आहे. हे टॉवर्स पाडण्यासाठी ४६ जणांची टीम कार्यरत असणार आहे. 'सुपरटेक' कंपनीच्या मालकीचे हे टॉवर्स पाडण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयानं ३१ ऑगस्ट २०२१ रोजी दिले होते. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर तीनदा टॉवर्स पाडण्याची तारिख विविध कारणांमुळे पुढे ढकलण्यात आल्यानंतर अखेर आज हे टॉवर्स जमीनदोस्त करण्यात येणार आहेत. अनधिकृत बांधकामाचा आरोप करत 'द इमेरॉल्ड कोर्ट ओनर्स रेसिडेन्ट्स वेलफेअर'ने (RWA) या टॉवर्सविरोधात अलाहाबाद उच्च न्यायालयात धाव घेतली होती. न्यायालयाने बांधकाम अनधिकृत ठरवून हे टॉवर्स पाडण्याचे आदेश दिले होते. या विरोधात इमारत मालकांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. सर्वोच्च न्यायालयानेही अलाहाबाद उच्च न्यायालयाचा निकाल कायम ठेवत पाडकामाचे आदेश दिले होते. दरम्यान, या पाडकामासाठी नोएडा परिसरात मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला आहे. एनडीआरएफचं पथक देखील परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे. पाडकाम करण्याच्या अर्धा तासआधी नोएडा एक्स्प्रेसवे बंद करण्यात आजे. यासाठी नोएडातील अनेक मार्गांमध्ये बदल करण्यात आले आहेत.

## ट्विन टॉवर पाडल्यानंतर जमा होणारा ५५ हजार टनांचा मलबा कसा हटवणार?

मागील काही दिवसांपासून दिल्ली एनसीआरच्या नोएडा भागातील ट्विन टॉवरची जोरदार चर्चा पाहायला मिळत आहे. कारण दिल्लीच्या कुतुब मिनारहून जास्त उंची असलेले हे दोन जुळे टॉवर अखेर आज (२८ ऑगस्ट) दुपारी जमीनदोस्त केले जाणार आहेत. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून या दोन्ही इमारती पाडल्या जाणार आहेत.

नोएडाच्या सेक्टर ९३ मधील सुपरटेकच्या एमराल्ड कोर्ट गृहनिर्माण प्रकल्पात इमारतविषयक नियमावलीचे उल्लंघन करून हे टॉवर उभारण्यात आल्याचं न्यायालयात सिद्ध झालं आहे. त्यामुळे ४० मजल्यांच्या या दोन्ही इमारती पाडण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. मात्र, या अतिउंच इमारती पाडल्यानंतर त्याचा प्रचंड असा मलबा कसा व कुठे हटवला जाणार?, त्याबाबत काय नियोजन असणार याची देखील उत्सुकता निर्माण झाल्याचे दिसून येत आहे.

कारण, या भल्या मोठ्या इमारती कोसळल्यानंतर त्या ठिकाणी तब्बल ५५ हजार टन मलबा साचेल, ज्याची जवळपास ३५ हजार घनमीटर एवढी व्याप्ती असेल. कचऱ्याचे छोटे अंश हे धूळ म्हणून हवेत मिसळतात आणि सभोवतालच्या परिसरात स्थिरावत असतात.

नोएडा नियोजन प्राधिकरणाच्या म्हणण्यानुसार, २१ हजार क्यूबिक मीटर मलबा शहराच्या हद्दीतील एक निश्चित केलेल्या ठिकाणी नेला जाईल आणि तिथे तो टाकला जाईल. अहवालानुसार निश्चित केलेल्या ठिकाणचा भूखंड हा सहा हेक्टरचा आहे. तर, उर्वरती मलबा हा ट्विन टॉवरच्या ठिकाणी असेल, जिथे तो पुरण्यासाठी/साठविण्यासाठी खड्डा बनवला गेलेला आहे.

नोएडा प्राधिकरणाचे महाव्यवस्थापक (नियोजन) इश्तियाक अहमद यांनी पीटीआयला सांगितले की, 'टॉवर उद्ध्वस्त केल्यानंतरच्या ढिगाऱ्यांचे नियम आणि मार्गदर्शक तत्त्वांनुसार शास्त्रीय पद्धतीने व्यवस्थापन केले जाईल. त्यावर अंतिम निर्णय प्रादेशिक प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून घेतला जाईल.

### ढिगाऱ्यातून किमान चार हजार टन लोखंड आणि पोलाद बाहेर पडण्याची अपेक्षा

जे मलब्याच्या व्यवस्थापनावर एडिफिस इंजिनिअरिंगच्या अहवालाचे परीक्षण करत आहे. तसेच ढिगाऱ्यातून किमान चार हजार टन लोखंड आणि पोलाद बाहेर पडण्याची अपेक्षा आहे.

त्याचा उपयोग एडिफिस इंजिनिअरिंग या इमारती उद्ध्वस्त करण्यासाठी आलेल्या खर्चाची काही रक्कम वसूल करण्यासाठी करू शकते. याशिवाय, मलब्याचा कांही भाग नोएडा प्राधिकरणाच्या सेक्टर ८० मधील बांधकाम आणि विध्वंस कचरा व्यवस्थापन प्लांटमध्ये नेला जाण्याची शक्यता आहे. या प्लांटची क्षमता दररोज ३०० टन आहे. मात्र, या ठिकाणी मलब्यावर प्रक्रिया होणार की नाही हे अद्याप स्पष्ट नाही.

# राष्ट्रवादी काँग्रेसचा नवा प्लॅन; बंडखोर टार्गेट

सुराज्य/जळगाव



**उद्धव ठाकरे यांची साथ सोडून एकनाथ शिंदे यांच्यासोबत गेलेल्या शिवसेनेच्या बंडखोर आमदारांना धडा शिकवण्यासाठी आता राष्ट्रवादी काँग्रेस पुढाकार घेणार आहे. या माध्यमातून स्वपक्षाचा फायदा करून घेण्यासाठीही राष्ट्रवादी काँग्रेसने यासाठी खास रणनीती आखली आहे. शिवसेना सोडल्यामुळे स्थानिक कार्यकर्ते आणि जनतेच्या मनात बंडखोर आमदारांविषयी काहीशी नाराजी आणि संभ्रमाचे वातावरण आहे. याचाच फायदा उठवत शिवसेनेच्या बंडखोर आमदारांविरोधात रान उठवण्याचे आदेश प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना दिले आहेत.**

पक्षांतर करणे लोकांना आवडत नाही, त्यातच काही 'आमिष' घेऊन गेले असतील तर जनतेला ते अजिबात पसंत पडत नाही, त्याविरुद्ध जनतेत चीड निर्माण होते. त्यामुळे शिवसेनेतून पक्षांतर करून काही आमदार शिंदे गटात गेले आहेत, त्यांनी पक्षांतर कशासाठी केले आहे, त्याचीही सुरु चर्चा आहे. हाच मुद्दा धरुन बंडखोर आमदारांविरोधात रान उठवा. जनतेच्या मनात पक्षांतराबद्दल जागृती निर्माण करा. यामुळे जनतेत त्यांच्याविरुद्ध रोष निर्माण होईल व जनता त्यांना स्वीकारणार नाही. आगामी निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचा उमेदवार निवडून येण्यासाठी या गोष्टीचा फायदा होईल, असे जयंत पाटील यांनी सांगितले.

प्रदेशाध्यक्ष पाटील यांच्या उपस्थितीत जळगावात पक्षाची आढावा बैठक झाली. यावेळी अनेक महत्त्वाचे निर्णय झाले. राज्याच्या राजकारणात '५० खोके, एकदम ओके' या सत्ताधाऱ्यांविरोधातील महाविकास आघाडीच्या घोषणेने चांगलाच धुमाकूळ घातला आहे. आता याच घोषणेचे 'टी शर्ट' वाटून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये राष्ट्रवादीकडून प्रचार करण्यात येणार आहे.

आगामी स्थानिक संस्थांच्या निवडणुकीत शिवसेना राष्ट्रवादीची आघाडी होणार आहे. यासाठी आपल्याला प्रत्येक तालुक्यात सभासद संख्या अधिक करावी लागणार आहे, जर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या पक्षाची सभासद संख्या अधिक असली, तर आपल्याला त्याठिकाणची जागा मागता येणार नाही, यासाठी राष्ट्रवादीची ताकद दाखवावी लागेल, याची जाणीव जयंत पाटील यांनी कार्यकर्त्यांना करुन दिली.

# शिंदे-फडणवीस सरकार येताच अमित शहा सक्रिय

## ५ सप्टेंबरला मुंबई दौरा, राजकीय हालचालींना वेग

सुराज्य/मुंबई



**राज्यात महाविकास आघाडीचे सरकार उलथवून शिंदे-फडणवीसांची सत्ता आल्यानंतर भाजपचे दुसऱ्या क्रमांकाचे नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे ॲक्शन मोडमध्ये आले आहेत. राज्याची सत्ता मिळाल्यानंतर आता शिवसेनेला पूर्णपणे संपवण्यासाठी मुंबई महानगरपालिका ताब्यात घेण्यासाठी भाजप पक्ष आक्रमकपणे कामाला लागला आहे. मुंबई महानगरपालिकेची ही लढाई लढण्यासाठी अमित शाह जातीने मैदानात उतरण्याची शक्यता आहे. त्याचाच एक भाग म्हणून अमित शाह गणेशोत्सवाच्या काळात मुंबईत एक दौरा करणार आहेत.**

अमित शाह हे ५ सप्टेंबर रोजी मुंबईत येतील. यावेळी ते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अमित शाह आणि भाजपचे मुंबई प्रदेशाध्यक्ष आशिष शेलार यांच्या घरी गणरायाच्या दर्शनाला जाणार आहेत. त्यानंतर आपल्या दरवर्षीच्या शिरस्त्याप्रमाणे अमित शाह हे मुंबईतील प्रसिद्ध लालबाग सार्वजनिक गणेश मंडळाच्या गणपतीचे दर्शन घेणार आहेत.

अमित शाह २०१७ साली भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष झाले होते. तेव्हापासून अमित शाह लालबागच्या राजाच्या दर्शनाला न चुकता येतात. मात्र, गेल्या दोन वर्षांमध्ये कोविडमुळे अमित शाह यांना लालबागच्या राजाचे दर्शन घेता आले नव्हते. मात्र, यंदा गणेशोत्सवावर कोणतेही निर्बंध नसल्याने अमित शाह लालबागच्या राजाचे दर्शन घ्यायला येणार आहेत. यंदाच्या वर्षाच्या अखेरीस मुंबई महानगरपालिकेची निवडणूक होऊ घातली आहे. ही निवडणूक शिवसेना आणि भाजप यांच्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. या पार्श्वभूमीवर अमित शाह यांचा गणेशोत्सवाच्या काळातील गणपती दौरा हा निर्णायक ठरण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे अमित शाह यांच्यानंतर भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा हेदेखील मुंबईत येणार आहेत. १५ आणि १६ डिसेंबरला जे.पी. नड्डा यांचा मुंबई दौरा असेल.

राज्यात शिंदे-फडणवीस सरकार आल्यानंतर अमित शाह हे पहिल्यांदाच महाराष्ट्रात येत आहेत. काही दिवसांपूर्वी अमित शाह नाशिक दौऱ्यावर येणार होते. परंतु, त्याचवेळी एकनाथ शिंदे हे शिवसेनेतील आमदारांना घेऊन नॉट रिचेबल झाले होते. त्यामुळे आता अमित शाह मुंबई दौऱ्यात नेमकं काय करणार, याची उत्सुकता राजकीय वर्तुळाला लागली आहे.

## ठाकरे यांना पुन्हा धक्का, शिवसेनेचे आणखी दोन आमदार फुटणार?

**सुराज्य/मुंबई** : एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर सतत पडझड सुरु असलेल्या शिवसेनेला आणखी दोन हादरे बसण्याची शक्यता आहे.



शिंदे गटाचे आमदार आणि रोहयो मंत्री संदिपान भुमरे यांनी लवकरच शिवसेनेतील आणखी दोन आमदार फुटतील, असा खळबळजनक दावा केला आहे. तसे घडल्यास हा उद्धव ठाकरे यांच्यासाठी मोठा धक्का असू शकतो. त्याचवेळी अगदी शेवटपर्यंत उद्धव ठाकरे यांच्यासोबत राहिलेले कोणते दोन शिलेदार त्यांची साथ सोडणार, याचीही उत्सुकता सर्वांना लागली आहे.

## सैनिकी क्षेत्राच्या हवाई हद्दीत ड्रोन उडवला, गुन्हा दाखल

सुराज्य/नाशिक

सैनिकी क्षेत्राच्या हवाई हद्दीत ड्रोन उडवण्यात आल्याचा गंभीर प्रकार उघड झाला आहे. सैनिकी क्षेत्राच्या हवाई हद्दीत 'नो ड्रोन झोन' असूनही रात्री तिथे २-३ मिनिटं ड्रोन उडवल्याचं प्रकार समोर आला आहे. रायगडच्या श्रीवर्धनमध्ये काही दिवसांपूर्वी बोटीत घ ४७ गन सापडल्यानंतर सुरक्षा यंत्रणांना हायअलर्ट दोण्याता आला होता. आता यानंतर ही घटना समोर आली आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### ठाकरे-शिंदे यांचे समुद्रमंथन! वादग्रस्त देखावा रोखला

**सुराज्य/पुणे** : गणेशोत्सवात अफजल खान वधाचा जिवंत देखावा साकारण्याचा वाद ताजा असतानाच आता पुण्यातील आणखी एक देखावा वादग्रस्त असल्याची माहिती समोर आली आहे. या देखाव्याला पुणे पोलिसांनी परवानगी नाकारल्यानंतर संबंधित मंडळानेही माघार घेतली आहे. त्यामुळे हा वाद शमला आहे. परंतु, या देखाव्यातील काही पुतळ्यांची छायाचित्रं सोशल मीडियावर व्हायरल झाली आहेत. त्यामुळे गणेशोत्सवापूर्वीच या देखाव्याची चांगलीच चर्चा रंगली आहे. पुण्यातील नरेंद्र मित्र मंडळाने राज्यातील सत्तांतराच्या पार्श्वभूमीवर हा देखावा साकारला होता. सत्ताधाऱ्यांचे समुद्रमंथन आणि कार्यकर्त्यांचे मरण' या नावाने सादर होणाऱ्या देखाव्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे समोरासमोर दाखवण्यात आले आहे. हे दोघे सत्तेचे समुद्रमंथन करताना दाखवण्यात आले होते. या सगळ्यात सामान्य जनतेचे कशाप्रकारे मरण होत आहे, असा संदेश देण्याचा प्रयत्न होता. मात्र, या देखाव्यावरून वाद निर्माण होण्याची दाट शक्यता होती. त्यामुळे पोलिसांनी या देखाव्याला परवानगी नाकारली.

### पुढील वर्षी काश्मीरमध्येही गणेशोत्सव होणार

**सुराज्य/पुणे** : पुढील वर्षीचा म्हणजे सन २०२३मधील गणेशोत्सव काश्मीरमधील जिल्ह्यांमध्ये साजरा करण्याचा निर्णय शनिवारी मानाच्या गणपतींतर्फे जाहीर करण्यात आला. मात्र, या निर्णयाला श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टने विरोध दर्शवला असून, या निर्णयाला कोणताही पाठिंबा नसल्याचे त्यांनी जाहीर केले आहे. यामुळे आता नव्या वादाला तोंड फुटण्याची चिन्हे आहेत. मानाचे पहिले पाच गणपती आणि श्रीमंत भाऊसाहेब रंगारी, अखिल मंडई मंडळ आणि दगडूशेठ हलवाई ट्रस्ट असे एकूण आठ गणपती मिळून शनिवारी अष्टविनायक मंचाची घोषणा करणार होते. या मंडळाच्या पदाधिकाऱ्यांसह पुनीत बालन यांनी या मंचाची घोषणा पत्रकार परिषदेत केली. या परिषदेला दगडूशेठ मंडळाकडून एकही पदाधिकारी उपस्थित नव्हता. याचवेळी बालन यांनी पुढच्या वर्षी काश्मीरमध्ये गणेशोत्सव करण्याचा निर्णय जाहीर केला. किमान दीड दिवस काश्मीरच्या वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये हा उत्सव साजरा केला जाईल, अशी माहिती त्यांनी दिली.

# 'नेता म्हणून कधीच मिरवलो नाही'

## संभाजीराजे यांचे चोख प्रत्युत्तर



सुराज्य/कोल्हापूर

**संभाजीराजेंचं नेतृत्व आम्ही स्वीकारणार नाही, अशी स्पष्ट भूमिका मराठा मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी घेतल्यानंतर आता संभाजीराजेंनी देखील आक्रमक भूमिका घेतली आहे.**

**मराठा आरक्षणाच्या लढ्यात मी काही आज आलेलो नाही. २००७ पासून मी या चळवळीत पूर्णतः सक्रिय आहे. माझा राजवाडा, घरदार सोडून, वैभवसंपन्न जीवनशैली सोडून मी महिनो महिने समाजासाठी राज्यभर फिरत असतो. माझे प्रामाणिक कार्य पाहून कित्येक संघटनांनी, लोकांनी अनेकवेळा माझ्याकडे नेतृत्व दिले, पण कधीही मी स्वत:हून हे नेतृत्व स्वीकारले नाही. नेता म्हणून मिरवलो नाही.**

**फेसबुकवर लिहिणारे आणि मीडियावर बोलणारे राजकीय नेत्यांच्या दावणीला बांधलेले काल आलेले मूठभर लोक म्हणजे समाज नव्हे, अशा शब्दात संभाजीराजेंनी मराठा मोर्चाच्या समन्वयांना रोखठोक प्रत्युत्तर दिलं आहे.**

राज्यात शिंदे-फडणवीस सरकार आल्यानंतर मराठा आरक्षणाचा प्रश्न लवकर मार्गी लागेल, अशी अनेकांना आशा आहे.

पावसाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी मराठा आरक्षणातून निवड होऊनही गेली काही वर्षे नोकरीच्या प्रतीक्षेत असलेल्या १,०६४ मराठा तरुणांना सरकारी सेवेत सामावून घेण्याचा मार्ग मोकळा झाला होता. त्यानंतर मराठा क्रांती मोर्चाच्या समन्वयक आणि पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले होते. अधिवेशनाचे कामकाज संपल्यानंतर एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मराठा आरक्षणासाठीची बैठक पार पडली. मात्र, या बैठकीत मराठा आरक्षणाबाबत चकार शब्दही काढण्यात आला नाही.

बैठकीला उपस्थित असणाऱ्या संभाजीराजे छत्रपती यांनी मराठा समन्वयकांना तसे बजावले होते. त्यामुळे सरकारने संभाजीराजे छत्रपती यांनाही मॅनेज केल्याचे दिसत आहे, असा खळबळजनक आरोप मराठी क्रांती मोर्चाच्या समन्वयकांनी केला. त्यांच्या याच आरोपांना संभाजीराजेंनी रोखठोक उत्तर दिलं आहे.

माझे प्रामाणिक कार्य पाहून कित्येक संघटनांनी, लोकांनी अनेकवेळा माझ्याकडे नेतृत्व दिले, पण कधीही मी स्वत:हून हे नेतृत्व स्वीकारले नाही. नेता म्हणून मिरवलो नाही.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या शिकवणीप्रमाणे समाजाचा एक सेवक म्हणूनच कार्यरत राहिलो व यापुढेही राहीन. समाजासाठीचा माझा हा लढा मराठा समाजाला आरक्षण मिळेपर्यंत सुरूच राहील.

CMYK

# सोलापूरच्या विकासाला मिळणार गती : मगर

## भव्य आणि दिमाखदार सोहळ्यात ला-अर्का प्रोजेक्टचे उद्घाटन

✔ सुराज्य/सोलापूर

**सोलापूरशी नाळ जोडून ठेवत पुण्यात अस्तित्व निर्माण करण्याचे काम प्रमोद साठे यांनी केले आहे. आपल्या तीस वर्षांच्या यशस्वी वाटचालीनंतर त्यांनी सोलापुरात उभारलेल्या वेंकटेश ला-अर्का प्रोजेक्टमुळे सोलापुरात आयटी सारख्या कंपन्या येण्यास वाव असून सर्विस इंडस्ट्री वाढून रोजगार वाढीला चालना मिळेल, असा विश्वास क्रेडाई संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष सतीश मगर यांनी व्यक्त केला.**




माहिती पुस्तीकेचे प्रकाशन

रविवारी सकाळी विजापूर रोड परिसरात 'स्पेन इन सोलापूर' या थीमवर आधारित असलेल्या ला-अर्का प्रोजेक्टचा शुभारंभ करण्यात आला. त्याप्रसंगी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटक माजी सहकारमंत्री आ. सुभाष देशमुख, श्री व्यंकटेश बिल्डकॉनचे अध्यक्ष अंकुश आसबे, आ. समाधान आवताडे, आ. संजयमामा शिंदे, ज्येष्ठ नेते बळीरामकाका साठे, भाजप प्रदेश कार्यकारिणी सदस्य शहाजी पवार, आंतरराष्ट्रीय किर्तीचे मूर्तिकार भगवान रामपुरे, नगरचे उपजिल्हाधिकारी सुधीर भोसले, क्रेडाईचे राज्याध्यक्ष सुनील फुरडे, बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडियाचे महाराष्ट्राध्यक्ष दत्तामामा मुळे, नगरसेवक प्रथमेश कोठे, अमोल शिंदे, चेतन नरोटे, उद्योजक युवराज चुंबळकर, भाजप शहराध्यक्ष विक्रम देशमुख आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

क्रेडाईचे अध्यक्ष सतीश मगर मार्गदर्शन करताना पुढे म्हणाले की, कोरोना कालावधीनंतर प्रत्येकाला आपल्या गावी घर असण्याची गरज वाटू लागली आहे. मुंबई-पुण्यासारख्या ठिकाणी राहणाऱ्यांना तर त्याचे महत्त्व आता पटले आहे. ला- अर्का प्रोजेक्टकडे सोलापुरातील नागरिक वीकेंड हाऊस, सर्व सुविधा असलेली नगरी म्हणून स्वीकारतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे उद्घाटक सुभाष देशमुख आपल्या भाषणात बोलताना म्हणाले की, सरकारी नोकरी सोडून व्यवसायात पाऊल ठेवून यशाचे शिखर गाठण्याचे काम प्रमोद साठे यांनी केले आहे. व्यासपीठावरील सर्व उद्योजकांनी आपापल्या गावी मोठ-मोठे प्रोजेक्ट राबवल्यास सोलापुरातील नागरिकांना त्याचा फायदा होऊ शकतो, असे सांगत प्रमोद साठे यांना वडाळा येथे तर अंकुश आसबे यांना मोहोळ येथे एखादा प्रोजेक्ट आणावा, अशी इच्छा देशमुख यांनी व्यक्त केली. संचालक आकाश साठे यांनी याठिकाणच्या सुविधांची माहिती दिली.

याप्रसंगी ज्येष्ठ नेते बळीरामकाका साठे, माजी आ. राजन पाटील, आ. संजयमामा शिंदे, आ. समाधान आवताडे यांनी प्रमोद साठे यांच्या संघर्षमय जीवनाचा आढावा घेऊन त्यांनी गाठलेल्या यशोशिखराबद्दल कौतुक केले. आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी ही भेट दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्वेता हुल्ले यांनी केले तर आभार योगिता मॅडम यांनी मांनले.



दीपप्रज्वलन

### उद्घाटन सोहळ्याची वैशिष्ट्ये

* १४ एकर परिसरातील प्रोजेक्टच्या उद्घाटनासाठी आकर्षक शामियाना
* मान्यवरांच्या स्वागतासाठी आकर्षक ढोल ताशांचे पथक
* एलईडी स्क्रीनवर दाखवली प्रकल्पाची वैशिष्ट्यपूर्ण माहिती
* व्यासपीठावर सर्वपक्षीय मान्यवरांची उपस्थिती



सुविधांची पाहणी

### स्पॅनिश थीम मेंटेन राहणार

प्रत्येकाला इच्छेनुसार त्यांच्या प्लॅनिंगनुसार येथे बांधकाम करता येणार आहे. स्पॅनिश थीम म्हणून फक्त उपयोग नाही तर मेंटेन होण्यासाठी रेरामध्ये अटी घातल्या आहेत. सोलापुरातील पाणी समस्येवर मात करण्यासाठी ३ लाख लिटर क्षमतेची पाणी टाकी उभारण्यात आली आहे, अशी माहिती प्रकल्पाचे सर्वेसर्वा प्रमोद साठे यांनी प्रास्ताविकात सांगितले.

### सन्मान... कौतुक... थाप

मंचावरील मान्यवरांचा सन्मान करताना त्यांना आकर्षक स्मृतिचिन्हे भेट देऊन सन्मानीत करण्यात आले. तर साठे परिवाराशी ऋणानुबंध जपणाऱ्या आणि नेहमी सहकार्य करणाऱ्यांचे ऋण व्यक्त करण्यात आले. याच कार्यक्रमात उमाकांत गुंड, मुजीब शेख, विष्णु संगम, संतोष तुपे या कर्मचाऱ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारण्यात आली. या सर्व सत्कार सोहळ्याची दखल क्रेडाई संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष सतीश मगर यांनी घेत प्रमोद साठे यांनी सर्वांना खुश केल्याचे सांगत त्यांच्या सुस्वभावाचे कौतुक केले.

## राणी लक्ष्मीबाई मंडई येथे अनधिकृत भाजीविक्रेत्यांवर कारवाई

✔ **सुराज्य/सोलापूर** : स्मार्ट सिटी योजनेंतर्गत पुनर्बांधणी केलेल्या राणी लक्ष्मीबाई मंडई येथे रस्त्यावरील अनधिकृत भाजी विक्रेत्यांवर शनिवारी दुपारी महापालिका मंडई विभाग व अतिक्रमण विरोधी पथकाने संयुक्त कारवाई केली. कारवाई वेळी विक्रेते व कर्मचाऱ्यांमध्ये शाब्दिक चकमक झाली. या कारवाईत चार चाकी ५ गाड्यासह फळभाज्या, साहित्य जप्त करण्यात आले. या कारवाईमुळे लगताचा रस्ता दुतर्फा वाहतुकीसाठी रिकामा झाला. या रस्त्याने मोकळा श्वास घेतला.

स्मार्ट सिटी योजनेतून मध्यवर्ती ठिकाणी असलेली राणी लक्ष्मीबाई मंडई नियोजनपूर्वक विकसित करण्यात आली. भाजी विक्रेत्यांसाठी या मंडईत व्यवस्थितपणे ओटे उपलब्ध करण्यात आले आहेत. मात्र मंडई लगतच्या रस्त्यावर अनधिकृतपणे भाजी व फळ विक्रेते तसेच चार चाकी गाड्यांवर विक्री करणाऱ्यांविरोधात शनिवारी सकाळी ११ वाजता महापालिका मंडई विभाग व अतिक्रमण विरोधी पथकाने संयुक्त कारवाई सुरु केली. पोलीस बंदोबस्तात ही कारवाई करण्यात आली. महापालिकेच्या या पथकास पाहताच विक्रेत्यांनी आपापला माल घेऊन पळापळ करण्यास सुरुवात केली. याप्रसंगी विक्रेते व महापालिका कर्मचाऱ्यांमध्ये शाब्दिक चकमक उडाली. काही विक्रेत्यांनी विरोध केला. कष्ट करून खातो. कारवाई योग्य नाही. उदरनिर्वाह कसा करायचा असा प्रश्न उपस्थित केला. महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांच्या आदेशानुसार उपायुक्त मच्छिंद्र घोलप मार्गदर्शनाखाली महापालिका मंडई विभागाचे प्रमुख जगन्नाथ बनसोडे यांनी ही संयुक्त कारवाई केली.

**आज १९२ ओट्यांचा होणार लिलाव**

सोमवार २९ ऑगस्ट रोजी राणी लक्ष्मीबाई मंडई येथील १९२ ओट्यांचा लिलाव करण्यात येणार आहे. या लिलावात विक्रेत्यांनी सहभागी व्हावे. ओट्यावरच भाजी व फळ विक्री करावी. मंडईच्या आजूबाजूला, रस्त्यावर अनधिकृतपणे भाजी विक्री केल्यास महापालिकेच्या वतीने कारवाई करण्यात येईल असे आवाहन महापालिका मंडई विभागाचे प्रमुख जगन्नाथ बनसोडे यांनी केले. या मोहिमेमध्ये महापालिका मंडई विभागाचे राजेंद्र बाबरे, शहापुरे, पिडगुळकर, आर. डी. कांबळे, खरटमल, खान, शिवशरण, तळभंडारे, अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे कोमुल यांच्यासह कर्मचारी सहभागी झाले होते.

## सोलापूर जिल्ह्यातील महामार्गासाठी निधी द्या : आ. रणजितसिंह



✔ सुराज्य/अकलूज

सोलापूर जिल्ह्यातील संत तुकाराम महाराज पालखी महामार्ग व संत ज्ञानेश्वर महाराज पालखी महामार्गावर सेवा व सुविधा निर्माण करण्यासंदर्भात तसेच करमाळा-माढा तालुक्यातील रस्त्यासाठी केंद्रीय मार्ग निधी उपलब्द करुन द्यावा अशी मागणी आ रणजितसिंह मोहिते पाटील यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली आहे.

आ मोहिते पाटील यांनी मुंबई येथे ना. गडकरी यांची भेट घेवून सोलापूर जिल्ह्यातील रस्ते व पालखी महामार्ग विकासासाठी निधीची मागणी केली. महाळुंग बायपास येथील कि. मी ११८ मधील भुयारी मार्ग हा ४ मीटर ऐवजी ७ मीटर उंचीचा करावा, संत तुकाराम महाराज पालखी मार्गावर अकलुज बायपास दरम्यान निरा नदी जवळ अकलुज-तांबवे रोडसाठी भुयारी मार्ग करावा, संत तुकाराम महाराज पालखी मार्गावर बोरगाव येथे दोन्ही बाजुनी २ कि. मी चे सर्विस रोड करण्यात यावेत, सदाशिवनर-पुरंदावडे गावातुन जाणारा संत ज्ञानेश्वर पालखी मार्ग क्रमांक ९६५ वरील उडाणपुल प्लेट ऐवजी कॉलमचा उड्डाणपुल करण्यात यावा, इंदापुर- सांगोला महामार्ग क्र ९६५ जी मध्ये अकलुज बायपाससह अकलुज-वेळापुर १४. ९०० कि. मी. रोड, नॅशनल हायवे म्हणुन घोषित करावा, संत ज्ञानेश्वर पालखी मार्गावर दसुर कि. मी. ९३-५६० मध्ये जि. प शाळेसाठी भुयारी मार्ग करण्यात यावा, संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गावर पुरंदावडे येथे कि. मी ९३-०८० मध्ये जि. प. शाळेजवळ भुयारी मार्ग करण्यात यावा, सदाशिवनर कि. मी. ९५-०८० मध्ये कॅनॉलजवळ भुयारी मार्ग देण्यात यावा, कारुंडे कि. मी ११३-८४० कारुंडे ग्रामीण मार्गासाठी भुयारी मार्ग देण्यात यावा, पालखी मार्गावर पुरंदावडे, वेळापुर, वाखरी येथे पालखी तळ व ड्रेनिज सिस्टीम करण्यात यावी अशी मागणी केली.

## नगराध्यक्ष डॉ. देशमुख यांना 'राष्ट्रीय सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार

✔ सुराज्य/सोलापूर

श्रीनाथ विद्यालय माळशिरस याठिकाणी पंतप्रधान मन की बात व सत्कार समारंभ हा कार्यक्रम संपन्न झाला. माळशिरस नगरपंचायतीचे नगराध्यक्ष डॉ. आप्पासाहेब देशमुख यांना अविष्कार फांऊडेशन सोलापूर यांच्या मार्फत 'राष्ट्रीय सामाजिक कार्यकर्ता २०२२' पुरस्कार प्रदान करण्यात आला. अविष्कार फांऊडेशन सोलापूर समितीच्या वतीने समाजात विविध समाजपयोगी सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार दरवर्षी देण्यात येतो. डॉ. आप्पासाहेब देशमुख यांनी आपल्या सामाजिक, शैक्षणिक, राजकीय




व सांस्कृतिक क्षेत्रात अनेक मोठे योगदान दिले असून राजकीय क्षेत्रात ही भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष व माळशिरस शहराच्या नगराध्यक्ष पदावर राहून अनेक कामे मार्गी लावली. या सर्व कार्याची दखल घेऊन राष्ट्रीय सामाजिक कार्यकर्ता २०२२ पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. यावेळी पंतप्रधान मन की बात हा कार्यक्रम देखील संपन्न झाला. त्यांच्या या गौरवामुळे सर्व स्तरावर कौतुक केले जात आहे. यावेळी नगरसेवक वैभव जानकर, बाबा मदने, लहू मदने, बाबासाहेब माने, रावसाहेब देशमुख, बापूराव सरगर, विकास लष्करे, विजय मंजुळे, दादा जानकर, सचिन केंगार, प्राचार्य योगेश गुजरे, सर्व शिक्षक व बहुसंख्य पालक वर्ग उपस्थित होता.

## खासगी टँकरने पाणीपुरवठा करण्याची मक्तेदारी मोडीत

### आयुक्तांनी पालिकेचे दरवर्षी वाचवले १ कोटी

✔ **सुराज्य/सोलापूर** : शहरात खाजगी टँकरने पाणीपुरवठा बंद केल्याने महापालिकेचे दरवर्षी तब्बल एक कोटी रुपये वाचले आहेत. आयुक्त पी. शिवशंकर यांनी खासगी टँकरने पाणीपुरवठा करण्याची मक्तेदारी मोडीत काढली आहे.

सोलापूर शहरात हद्दवाढ भागात पूर्वी खासगी टँकरने पाणीपुरवठा केला जात होता. तसेच पाणीपुरवठा विस्कळीत झाल्यास गावठाण भागातही खासगी टँकरने पाणीपुरवठा केला जात होता. टँकरने पाणीपुरवठा करण्यासाठी मक्ता देण्यात येत होता. टँकरच्या प्रत्येक खेपेप्रमाणे मक्तेदारास बिल दिले जात. महापालिका झोन कार्यालयाच्या अंतर्गत नोंदी केल्या जात होत्या. मात्र महापालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांना हाताशी धरून मक्तेदार परस्पर खेपा वाढवून बिले लाटत असल्याचे आरोप करण्यात आले होते. महापालिकेचा दरवर्षी सुमारे १ कोटी रुपये खाजगी टँकर बिलावर खर्च होत होता. महापालिका आयुक्त शिवशंकर यांनी पदभार घेतल्यानंतर मात्र खासगी टँकरने पाणीपुरवठा करण्याची मक्तेदारी मोडीत काढली. टँकरच्या खेपात खपण्यापासून महापालिकेला आयुक्त पी. शिवशंकर यांनी वाचविले. दरम्यान, विभागीय चौकशीत सोलापूर महापालिकेत लाखोंचा टँकर घोटाळा झाल्याची खळबळजनक बाब समोर आली आहे. सन २०१७ -१८ या वर्षात खाजगी टँकरचे झोन नंबर २ मध्ये तब्बल ९० लाख रुपये बिल अदा केल्याची माहिती आहे. खाजगी टँकर पाणीपुरवठ्यात संगनमताने काहीजणांनी हात धुवून घेतले. बिलाची लयलूट थांबविण्यासाठी खाजगी टँकरची सर्व मक्तेदारी महापालिका आयुक्त पी शिवशंकर यांनी पार मुळासकट उपटून काढली. यामुळे महापालिकेची कोट्यवधी रुपयांची बचत झाली आहे.

### सध्या केवळ ७ टँकरने पाणीपुरवठा

खासगी टँकर बंद करून महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी शहरात जिथे आवश्यक आहे तिथेच वायटॅग व जीपीएसप्रणाली वापरून महापालिकेच्या मालकीच्या टँकरने पाणी पुरवठा सुरु ठेवला. महापालिकेच्या एकूण ७ टँकरने सध्या पाणीपुरवठा केला जात आहे. यामुळे मोठा खर्च वाचला आहे.

## रातोरात आसरा चौक-डी.मार्ट रस्ता डांबरीकरण काम सुरु

### दिलीप माने यांच्या आंदोलनाचा धसका

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर शहरातील रहदारीचे रस्ते तातडीने डांबरीकरण करा तसेच सोरेगाव मलनिस्सारण पाणी प्रश्न त्वरीत सोडवा या मागणीसाठी माजी आमदार दिलीपराव माने यांनी १सप्टेंबर रोजी महानगरपालिकेसमोर उपोषण करण्याचा इशारा दिला याची दखल घेत महापालिका प्रशासनाने आसरा



ते डिमार्ट हा रस्ता रातोरात डांबरीकरण करण्याचे काम सुरु केले.

सोलापूर शहरातील अति रहदारी असलेले आसरा चौक ते डिमार्टपर्यंतचा रस्ता, सात रस्ता ते महावीर चौक पर्यंतचा रस्ता, महावीर चौक ते अशोक चौक मार्केट यार्ड पर्यंतचा रस्ता, छत्रपती शिवाजी महाराज चौक ते संभाजी महाराज पुतळ्यापर्यंतचा रस्ता, सिध्देश्वर प्रशाला ते सिध्देश्वर कन्या प्रशाला हे रस्ते तातडीने डांबरीकरण करुन नागरिक, वहानधारकाची सोय करण्याची मागणी माजी आमदार दिलीपराव माने यांनी महापालिका आयुक्तांशी चर्चा केली तर १०दिवसात रस्ता डांबरीकरण कामे न झाल्यास आंदोलन करण्याचा इशारा दिला होता.याशिवाय सोरेगाव येथील मलनिस्सारण पाण्याचा प्रश्न सोडवावा..तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासकीय नुकसानभरपाई मिळावी यासाठी देखील चर्चा केली. मात्र प्रशासनाने आजवर कसलीही कारवाई न केल्यामुळे १ सप्टेंबर रोजी महानगरपालिका समोर आंदोलन करणार असल्याचा निर्णय माने यांनी घेतला..याची दखल घेत प्रशासनाने तातडीने रातोरात आसरा चौक डि मार्ट जाणारा रस्त्याचे डांबरीकरण काम सूरु केले माजी आमदार दिलीपराव माने यांनी दिलेल्या आंदोलनाचा धसका घेऊन प्रशासनाने काम सुरु केल्याची व असा खमक्या लोकप्रतिनिधी हवा अशी चर्चा या भागात नागरीक करीत आहेत.